
रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १८ ◆ अंक १८२
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ रविवार, १८ जानेवारी २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

मुंबईच्या महापौरपदाबाबत एकत्र बसून निर्णय घेऊ!/२
रविप्रहरमध्ये विविध विषयांवरील लेख/४
महाडचा आरुष कोल्हे मुंबई क्रिकेट संघाचा कर्णधार/८

## देशातील पहिल्या वंदे भारत शयनयान रेल्वेला हिरवा झेंडा



**मालदा (प. बंगाल) :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पश्चिम बंगाल आणि ईशान्य भारतात विकासकामांना वेग देणाऱ्या तीन हजार २५० कोटी रुपये खर्चाच्या विविध रस्ते आणि रेल्वे पायाभूत प्रकल्पांचे शनिवारी (दि. १७) उद्घाटन केले. मालदा रेल्वेस्थानकातून हावडा, गुवाहाटी आणि कामाख्यादरम्यान धावणाऱ्या देशातील पहिल्या वंदे भारत शयनयान रेल्वेलाही पंतप्रधानांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे हिरवा झेंडा दाखवला. त्याबरोबरच चार आधुनिक अमृत भारत एक्सप्रेस रेल्वेगाड्यांना त्यांनी हिरवा झेंडा दाखवला. शयनयान वंदे भारत रेल्वे पूर्णपणे वातानुकूलित असून प्रवाशांना परवडणाऱ्या दरात सेवा देणार आहे. यामुळे लांब पल्ल्याचा प्रवास जलद, सुरक्षित आणि अधिक सोयीस्कर होणार आहे. एकूण ८२३ प्रवाशांची क्षमता असलेल्या या रेल्वेत १६ आधुनिक कोच आहेत.

# कॅबिनेटमध्ये महत्त्वपूर्ण निर्णय

## राज्यातील शेतकरी, युवकांसह पोलिसांना मोठा दिलासा

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य मंत्रिमंडळाची बैठक शनिवारी (दि. १७) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीत प्रशासन, नागरी सुविधा, पायाभूत प्रकल्प, कृषी, रोजगार आणि जलसंपदा क्षेत्राशी संबंधित अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. या निर्णयांमुळे शासकीय यंत्रणांना बळकटी मिळणार असून शेतकरी, युवक, पोलिसांसह नागरिकांना थेट लाभ होणार आहे.

अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या १,९०१ पदांच्या आकृतीबंधास मान्यता देण्यात आली असून संचालनालयाचे नाव बदलून अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय करण्यात येणार आहे. जिल्हा नियोजन समित्या, सहआयुक्त (नियोजन), विभागीय आयुक्त कार्यालय, मानव विकास कार्यक्रम, वैधानिक विकास मंडळ, तीर्थक्षेत्र विकास कार्यक्रम आणि नक्षलवाद विशेष कृती आराखडा कक्षासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सुधारित आकृतीबंध मंजूर करण्यात आला आहे.

मुंबई शहर व उपनगरातील पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी सुमारे ४० ते ४५ हजार शासकीय निवासस्थाने उपलब्ध व्हावीत यादृष्टीने मुंबई पोलीस हाऊसिंग टाऊनशिप प्रकल्प राबविण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. या टाऊनशिप प्रकल्पाद्वारे सुमारे पाच कोटी चौरस फूट क्षेत्राचे विकसन करण्यात येणार असून त्यासाठी सुमारे २० हजार कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. प्रकल्पाचा तांत्रिक व आर्थिक सुसाध्यता अहवाल तयार करण्यासाठी आणि प्रकल्प सुरू करण्याकरिता महामंडळास १०० कोटी रुपयांचा प्राथमिक निधी देण्यास मान्यता देण्यात आली.



पीएम-ई ड्राईव्ह योजनेंतर्गत पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या १,००० ई-बस प्रकल्पासाठी निधी वळता करण्याच्या थेट प्रणालीस मान्यता देण्यात आली आहे. पेमेंट सिक्युरिटी मेकॅनिझम अंतर्गत पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिकांच्या खात्यातून डायरेक्ट डेबीट मॅन्डेटद्वारे संबंधित कंपन्यांना थेट पेमेंट होणार आहे.

तिरुमला तिरूपती देवस्थानम बोर्डला उलवे नोडमधील श्री पद्मावती अम्मावरी मंदिर उभारण्यासाठी वाटप केलेला भूखंड एक रुपया प्रति चौरस मीटर दराने देण्यास मान्यता देण्यात आली. ३.६ एकरचा हा भूखंड वाटप करण्याचा निर्णय २९ फेब्रुवारी २०२४ रोजी घेण्यात आला आहे. त्याबाबतचा शासन निर्णयही १२ मार्च २०२४ रोजी जारी करण्यात आला आहे.

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळांच्या मुख्यालयासाठी पनवेल (पश्चिम) येथील भूखंड विशेष बाब म्हणून १ रुपया प्रति चौमी दराने देण्यास मंजुरी देण्यात आली. सध्या महामंडळाचे मुख्यालय छत्रपती शिवाजी महाराज रेल्वेस्थानकाजवळ भाडे तत्त्वावर आहे. महामंडळाच्या मुख्यालय आणि बहुउद्देशीय इमारतीसाठी नवीन पनवेल सेक्टर १६मधील सहा हजार चौमीचा भूखंड देण्यात येणार आहे.

### भाजीपाला निर्यातीसाठी मल्टी-मॉडेल हब

शेतकऱ्यांच्या भाजीपाला निर्यातीस चालना देण्यासाठी बापगाव (ता. भिवंडी) येथे मल्टी-मॉडेल हब व टर्मिनल मार्केट उभारले जाणार आहे. यासाठी राज्य कृषी पणन महामंडळाला सात हेक्टर ९६.८० आर जमीन देण्यास मान्यता देण्यात आली. येथे व्हेपर हिट ट्रीटमेंट, प्लांट विकिरण, पॅक हाऊस व फळे-भाजीपाला साठवणूक सुविधा असेल.

### युवकांसाठी परदेशी रोजगाराची नवी दारे

जगभरातील विविध देशातील रोजगारासंबंधी समन्वय आणि अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र व्यापक आंतरराष्ट्रीय गतिशीलता आणि क्षमता संस्था स्थापन आणि कार्यान्वित करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली. या संस्थेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील तरुणांना विविध देशातील रोजगार उपलब्धता व संधींची माहिती उपलब्ध करून दिली जाईल.

### अटल सेतूवर टोल सवलत कायम

अटल बिहारी वाजपेयी शिवडी - न्हावाशेवा अटल सेतूच्या वापराकरिता पथकरात ५० टक्के सवलत देण्याचा निर्णय कायम ठेवण्यास मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली तसेच ईलेक्ट्रीकल मोटार, बसेस यांनाही येथे पथकरातून पूर्ण सूट देण्याबाबतचा मुद्दाही अधिसूचनेत समाविष्ट करण्यास मान्यता देण्यात आली.

# वरच्या देवाने ठरवलंय महायुतीचा महापौर होणार -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**पुणे : प्रतिनिधी**

देवाच्या मनात असेल तर आपला महापौर होईल या शिवसेना उबाठा प्रमुख व माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या विधानावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. 'देवाच्या मनात म्हणजे माझ्या की वरच्या देवाच्या?... कारण मला देवा म्हणतात, पण वरच्या देवाने ठरवले आहे की महायुतीचा महापौर करायचा आहे. त्यामुळे आमचाच होईल', असे फडणवीस यांनी स्पष्ट केले.



ते शनिवारी (दि. १७) पुण्यात पत्रकारांशी बोलत होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, मुंबईत महायुतीला ११९ जागा मिळाल्या असून आम्ही १४ जागा कमी मताने हरलो, पण आम्हाला पूर्ण बहुमत मिळाले आहे. गेल्या तीन निवडणुकांमध्ये एवढ्या जागा एकत्रित शिवसेनेला मिळाल्या नव्हत्या. आम्ही आधीचे रेकॉर्ड मोडले.

शिंदे आणि आम्ही बसून पुढचे ठरवू. आम्ही दोन्ही पक्ष छानपैकी मुंबई चालवून दाखवू. त्यांच्या काही जागा कमी मताने गेल्या आहेत. ते पहिल्यांदाच अशा पद्धतीने निवडणूक लढवत होते. त्यामानाने त्यांना चांगले यश मिळाले आहे, असेही मुख्यमंत्र्यांनी नमूद केले.





**डोंबिवली :** पनवेल महानगरपालिका निवडणुकीतील भाजप महायुतीच्या जोरदार विजयानंतर नवनिर्वाचित नगरसेवक-नगरसेविकांनी आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांच्यासमवेत भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची शनिवारी भेट घेतली. प्रदेशाध्यक्षांनी सर्वांचा सत्कार करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## निवडक

### छत्तीसगडमध्ये चकमकीत दोन नक्षलवाद्यांचा खात्मा

**बिजापूर :** छत्तीसगडमध्ये बिजापूर जिल्ह्यात शनिवारी (दि. १७) सुरक्षा दलांबरोबर झालेल्या चकमकीत दोन नक्षलवादी ठार झाले. जंगलाच्या वायव्य भागात नक्षलवादी असल्याची माहिती मिळाल्यावर पोलीस आणि सुरक्षा दलांच्या संयुक्त पथकाने शोधमोहीम हाती घेतली. त्या वेळी लपून बसलेल्या नक्षलवाद्यांनी पथकाच्या दिशेने गोळीबार केला. प्रत्युत्तरादाखल सुरक्षा पथकाने केलेल्या गोळीबारात दोन नक्षली ठार झाले असून त्यांचे मृतदेह ताब्यात घेतल्याची माहिती पोलिसांनी दिली.

### मुंबई महापालिका निवडणूक पराभवानंतर काँग्रेसमध्ये कलह

**मुंबई :** येथील महापालिका निवडणुकीत भाजप-शिवसेना युतीचा मोठा विजय झाला असून काँग्रेसला दारूण पराभव पत्करावा लागला. यानंतर काँग्रेस पक्षात कलह सुरू झाल्याचे समोर आले. पक्षाच्या मुंबई अध्यक्ष खासदार वर्षा गायकवाड यांच्या राजीनाम्याची मागणी आमदार भाई जगताप यांनी केली. दरम्यान, जगताप यांनी केलेल्या राजीनाम्याच्या मागणीनंतर पक्षाने त्यांना नोटीस पाठवून सात दिवसांत उत्तर मागितले आहे.

# शेतकरी लढ्यातील हुतात्म्यांना आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून अभिवादन

## उरणमधील पागोटे येथे स्मृतीदिन कार्यक्रम



**उरण : वार्ताहर**

१९८४ साली उरण तालुक्यात झालेल्या गौरवशाली व शेतकरी लढ्यातील हुतात्म्यांना आमदार प्रशांत ठाकूर आणि भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी शनिवारी (दि. १७) पागोटे येथील कार्यक्रमात अभिवादन केले.

शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी लोकनेते दि.बा. पाटील यांच्या नेतृत्वाखाली सन १९८४मध्ये लढा उभारण्यात आला होता. त्या वेळी दास्तान व नवघर येथे जमलेल्या शेतकरी आंदोलनकर्त्यांवर पोलिसांनी बेछूट गोळीबार केला. यात नामदेव शंकर घरत (चिर्ले), रघुनाथ अर्जुन ठाकूर (धुतुम), कमलाकर कृष्णा तांडेल, महादेव हिरा पाटील आणि केशव महादेव पाटील (पागोटे) हुतात्मे झाले. या पाचही हुतात्म्यांना अभिवादन करण्यासाठी आणि त्यांचे स्मरण करण्यासाठी दरवर्षी १६ जानेवारी रोजी जासईत, तर १७ जानेवारी रोजी पागोटे येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते.

हुतात्म्यांना अभिवादन करण्यासाठी शनिवारी पागोटे येथे स्मृतिदिन कार्यक्रम झाला. या कार्यक्रमाला भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, 'दिबां'चे पुत्र अतुल पाटील, भाजप जिल्हा सरचिटणीस व नगरसेवक नितीन पाटील, माजी जि.प. सदस्य विजय भोईर, माजी सरपंच योगेश पाटील, जितेंद्र म्हात्रे, गाव अध्यक्ष रजनीकांत पाटील, भार्गव पाटील, कॉ. भूषण पाटील आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी हुतात्म्यांना मानवंदना देण्यात आली तसेच हुतात्मा अमर रहे अशा घोषणा देण्यात आल्या.

## राष्ट्रसेविकांचे आज सघोष पथसंचलन

**म्हसळा : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा राष्ट्रसेविका समितीच्या वतीने रविवारी (दि. १८) सायंकाळी ४ ते ६ या वेळेत सघोष पथसंचलन जिल्ह्याच्या उत्तर विभागातून पनवेल आणि दक्षिण रायगड विभागातून माणगाव येथे करण्यात येणार आहे.

संचलनानंतर पनवेल येथे प्रमुख अतिथी म्हणून नेत्रचिकित्सक डॉ. संगीता जोशी, राष्ट्रसेविका समितीच्या प्रांत व्यवस्था प्रमुख कांचन पंडित या उपस्थितांना शुभसंदेश देणार आहेत, तर माणगाव येथील कार्यक्रमात राष्ट्रसेविका समितीच्या प्रांत सह-व्यवस्थाप्रमुख स्मिता आंबेकर शुभसंदेश देतील. समरस-सुखमय-सुसंघटीत समाज घडवण्यासाठी 'राष्ट्र सवापरी' हे बीज प्रत्येक कुटुंबात रूजविणे आवश्यक आहे. त्यासाठी सक्षम मातृशक्तीचे संघटनाचे काम गेली नऊ दशके राष्ट्रसेविका समिती करत आहे. दोन्ही ठिकाणी शिस्तबद्ध, सघोष संचलन पाहण्यासाठी आणि स्वागत करून ध्वजावर पुष्पवृष्टीसाठी महिलावर्गासह नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# महाराष्ट्रातील जनतेशी एनडीएचे नाते अधिक दृढ

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

महाराष्ट्रात झालेल्या २९ महापालिकांच्या निवडणुकीत भाजप आणि महायुतीला घवघवीत यश मिळाले आहे. याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर पोस्ट करत महाराष्ट्राचे आभार मानले आहेत.



**पंतप्रधान मोदींकडून राज्यातील जनतेचे आभार**

पंतप्रधान मोदींनी म्हटले की, महाराष्ट्राचे आभार! राज्यातील उत्साही जनतेने एनडीएच्या जनहितकारी आणि सुशासनाच्या अजेंड्याला आपले आशीर्वाद दिले आहेत! विविध महानगरपालिका निवडणुकांचे निकाल हे दर्शवितात की महाराष्ट्रातील जनतेशी एनडीएचे नाते अधिक दृढ झाले आहे. आमच्या कामगिरीचा अनुभव आणि विकासाची दृष्टी जनतेच्या मनाला भावली आहे. महाराष्ट्रातील सर्व जनतेप्रती मी मनापासून कृतज्ञता व्यक्त करतो. हा कौल प्रगतीला अधिक गती देणारा, राज्याशी जोडलेल्या गौरवशाली संस्कृतीचा उत्सव साजरा करणारा आहे.

'महाराष्ट्रभर जनतेसोबत राहून अहोरात्र परिश्रम करणाऱ्या एनडीएच्या प्रत्येक कार्यकर्त्याचा मला अभिमान आहे. त्यांनी आमच्या युतीच्या कामगिरीबाबत माहिती देताना आगामी काळासाठीचा आमचा दृष्टीकोणही अधोरेखित केला आणि विरोधकांच्या खोट्या आरोपांना प्रभावीपणे प्रत्युत्तर दिले. त्यांना माझ्या हार्दिक शुभेच्छा', असे म्हणत पंतप्रधान मोदींनी कार्यकर्त्यांचे मनोबलही वाढवले.

# नवी मुंबईत भाजपच्या विजयाचा जल्लोष

## प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, मंत्री गणेश नाईक यांची उपस्थिती



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिका निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने वनमंत्री गणेश नाईक यांच्या नेतृत्वाखाली एकूण १११ पैकी ६५ जागा जिंकत एकहाती सत्ता मिळवले. या विजयाचा आनंदोत्सव भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी सर्व नवनिर्वाचित नगरसेवक-नगरसेविकांसमवेत शनिवारी (दि. १७) साजरा केला.

या कार्यक्रमास मंत्री गणेश नाईक यांच्यासह माजी खासदार संजीव नाईक, माजी आमदार संदीप नाईक, भाजप जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील, माजी महापौर सागर नाईक तसेच पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी विजयी नगरसेवकांचे अभिनंदन केले तसेच ज्या भाजप उमेदवारांना अत्यंत कमी फरकाने किंवा अनपेक्षितपणे पराभवाचा सामना करावा लागला, त्यांच्याबद्दलही विशेष सकारात्मकता दर्शवली. निवडणुकीतील जय-पराजय हे रणांगणाचे भाग आहेत, पण ज्या सहकाऱ्यांनी पक्षाची विचारधारा आणि विकासाचा अजेंडा घराघरात पोहचवण्यासाठी प्रामाणिक कष्ट घेतले, ते आजही पक्षाचे तितकेच महत्त्वाचे आधारस्तंभ आहेत. त्यांच्या अनुभवाचा आणि कौशल्याचा उपयोग नवी मुंबईच्या विकासात नक्कीच करून घेतला जाईल, असे त्यांनी सांगितले.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त 'सीकेटी'त स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयात संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त शनिवारी (दि.१७) तालुकास्तरीय १९ वर्षाखालील मुला-मुलींच्या थ्रोबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत एकूण २५ संघांनी सहभाग घेतला.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी स्पर्धेस भेट सर्व स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या तसेच शालेय शिक्षण व जीवनातील खेळाचे महत्त्व विशद केले. पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर व त्यांच्या सुविद्य पत्नी अर्चना ठाकूर, समीर रेवाळे, निवृत्त सहशिक्षक प्रताप शिंदे यांनीही या स्पर्धेतील सहभागी संघांना प्रोत्साहन दिले.




संस्थेचे सदस्य ॲड. राहुल घरत यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन झाले. उच्च माध्यमिक विभागाचे प्राचार्य प्रशांत मोरे, इंग्रजी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे, मराठी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक कैलास सत्रे, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर, पर्यवेक्षक अजित सोनवणे, कैलास म्हात्रे, वैशाली पारधी, स्वाती पाटील यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. (पान २ वर..)

# मुंबईच्या महापौरपदाबाबत एकत्र बसून निर्णय घेऊ!

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईच्या महापौरपदाबाबत कोणताही वाद नाही महापौरपदाचा निर्णय एकनाथ शिंदे, मी आणि दोन्ही पक्षांचे वरिष्ठ नेते एकत्र बसून घेऊ, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी दिली.



राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांचे निकाल जाहीर होत असले तरी संपूर्ण देशाचे लक्ष मुंबई महानगरपालिकेच्या निकालांकडे लागले होते. या निवडणुकीत भाजप आणि शिवसेना यांच्या महायुतीने स्पष्ट बहुमत मिळवत सत्ता स्थापन करण्याचा मार्ग मोकळा केला आहे. दुसरीकडे उबाठा आणि राज ठाकरे यांच्या मनसेच्या आघाडीने ७० हून अधिक जागांवर विजय मिळवला असून विरोधी बाकांवरही मजबूत उपस्थिती निर्माण केली आहे.

मुंबईत भाजपने ८९ जागांवर विजय मिळवत सर्वात मोठा पक्ष म्हणून आपली ताकद सिद्ध केली आहे. तर महायुतीतील शिवसेनेने २९ जागा जिंकत सत्तेत महत्त्वाची भूमिका बजावली आहे. या निकालानंतर आता मुंबईचा पुढील महापौर कोण होणार, याबाबत चर्चा सुरू झाली आहे.

महापौरपदाबाबत शिवसेनेतील काही नवनिर्वाचित नगरसेवक आणि नेत्यांनी आपली अपेक्षा व्यक्त केली होती. यावर प्रसारमाध्यमांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विचारणा केली असता, त्यांनी कोणताही वाद होणार नसल्याचे स्पष्ट केले. महापौरपदाचा निर्णय एकनाथ शिंदे, मी आणि दोन्ही पक्षांचे वरिष्ठ नेते एकत्र बसून घेऊ, असे त्यांनी सांगितले.

मुंबई महापौरपदाबाबत बैठक घेऊन सविस्तर चर्चा केली जाईल. महापौर कोण असेल, किती काळासाठी असेल आणि सत्तेचे नियोजन कसे असेल, याचा निर्णय परस्पर समन्वयातून घेतला जाईल. कोणताही संघर्ष न करता दोन्ही पक्ष एकत्रितपणे मुंबईचे प्रशासन सक्षमपणे चालवतील, असा विश्वासही फडणवीस यांनी व्यक्त केला.

## दोन कार आणि दुचाकीचा अपघात एकाचा मृत्यू

**माणगाव :** मुंबई-गोवा महामार्गावर गारळ गावाच्या हद्दीत दोन कार आणि एक दुचाकीमध्ये झालेल्या अपघातात दुचाकीस्वाराचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

सविस्तर वृत्त असे की, शनिवारी (दि.१७) जानेवारी रोजी मुंबई-गोवा महामार्गावर सायंकाळच्या वेळेस गारल फाट्यावर हॉटेल आनंद भुवन समोर मारुती सुझुकी बलेनो (एमएच ४६ डीए १२२९) व मारुती सुझुकी व्हॅगनार (एमएच ०८ बीई ७५६१) तसेच होंडा शाईन (एमएच ०६ बीआर ६८२६)मध्ये अपघात झाला. या अपघातात मोटार सायकल स्वार जागीच ठार झाला. अण्णा काळे असे या दुचाकी स्वराचे नाव आहे.

या अपघाताची माहिती मिळताच माणगाव पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. स्थानिकांनी अपघातग्रस्तांना उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्यात मदत केली. या अपघाताचा पुढील तपास माणगाव पोलीस करत आहेत.

## भाजपचे बेलापूरमधून सर्वाधिक नगरसेवक विजयी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत बेलापूर मतदार संघातून भाजपचे सर्वाधिक नगरसेवक निवडून आले आहेत तर तब्बल वीस वर्षानंतर मनसेने आपले खाते उघडले आहे.

नवी मुंबई महापालिका निवडणुकीत शिवसेना आणि भाजपा पक्षात झालेल्या चुरशीच्या निवडणुकीत भाजपने वनमंत्री गणेश नाईक यांच्या नेतृत्वाखाली ६५ नगरसेवक निवडून आणले आहेत. त्यातील बेलापूर विधानसभा मतदार संघातून भाजपाचे सर्वाधिक तब्बल ३४ नगरसेवक निवडून आणण्यात वनमंत्री गणेश नाईक यांना यश आले आहे, मात्र आमदार मंदा म्हात्रे यांचे होम पीच असलेल्या बेलापूर प्रभाग क्रमांक २७ मध्ये भाजपचा एकही नगरसेवक निवडून आला नाही. त्या ठिकाणी पूर्ण पॅनल शिंदे सेनेचे आले आहे.

या निवडणुकीत भाजपच्या प्रीती संदीप भगत वाशी प्रभाग क्रमांक १८ मधून सर्वाधिक दहा हजार २६१ एवढ्या मताधिक्याने निवडून आल्या आहेत तर भाजपच्याच अंजली विजय वाळुंज वाशी प्रभाग क्रमांक १६ मधून ९४३६ एवढ्या मताधिक्याने दुसऱ्या सर्वाधिक मत प्राप्त करून विजयी झालेल्या नगरसेविका आहेत तर निशांत करसन भगत यांनी वाशी प्रभाग क्रमांक १८ मधून ९०५१ एवढ्या मताधिक्याने विजयी मिळवला तिसरा क्रमांकाची मते घेतली आहेत.

महाराष्ट्र नवनिर्माण सेना पक्षाने या निवडणुकीत अभिजित देसाई यांच्या रूपाने एक नगरसेवक निवडूण आणण्यात यश मिळवले आहे.

देसाई यांनी नेरूळ सानपाडा प्रभाग क्रमांक २२ मधील भाजपचे तगडे उमेदवार काशिनाथ पाटील यांना पराभूत केलं आहे. या प्रभागात मनसे उमेदवार देसाई यांना शिवसेना उभाठा पक्षाच्या शिवसैनिकांनी भक्कम साथ देत शेवटच्या फेरीत विजयश्री खेचून आणली.

मनसे नवी मुंबई अध्यक्ष गजानन काळे यांच्या नेतृत्वाखाली पक्षाने यावेळी २५ उमेदवार उभे केले होते. मनसेने यापूवी नवी मुंबईत तीन विधानसभा निवडणुका लढवल्या तर मागिल २०१० मध्ये झालेल्या मनपा निवडणुकीत ४८ उमेदवार उभे केले होते, मात्र २० वर्षात पहिल्यादा अभिजित देसाई यांच्या रूपाने मनसे प्रतिनिधी नवी मुंबई मनपा मध्य प्रवेश करणार आहे.

## कुडपण खुर्द येथे अखंड हरिनाम सप्ताह, शेलारमामा यांची ३५५वी पुण्यतिथी

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील ब्रिटीशकालीन हिलस्टेशन अशी थंड हवेचे ठिकाण म्हणून नोंद असलेल्या पर्यटनासाठी सर्वशृत असलेल्या पोलादपूर तालुक्यातील कुडपण खुर्द येथे अखंड हरिनाम सप्ताह आणि शेलारमामा यांच्या ३५५ व्या पुण्यतिथी सोहळ्याचे संयुक्त आयोजन २७ ते ३० जानेवारी २०२६ या कालावधीत करण्यात आले आहे.

तपोनिधी संत गणेशनाथ महाराज यांच्या प्रेरणेने व सदगुरु अरविंदनाथ महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक वर्षे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात येते. या अखंड हरिनाम सप्ताहाच्या कालावधीत रोज काकडा आरती, पारायण, हरिपाठ, किर्तन, जागर तसेच महिलांसाठी हळदी कुंकू तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रम तसेच आध्यात्मिक उपक्रम ग्रामस्थांच्या वतीने राबविण्यात येणार आहेत. याचबरोबर स्वराज्याचे मामा सरनौबत कोंडाजी रायाजी शेलार तथा शेलारमामा यांची ३५५ वी पुण्यतिथी समाधी सोहळा जन्मगाव कुडपण खुर्द येथे साजरी होणार आहे. समाधी सोहळा पुजन अभिषेक सदगुरु अरविंदनाथ गिरी महाराज यांच्याहस्ते करण्यात येणार आहे.

या वेळी फलोत्पादन,रोजगार हमी योजना,खारभुमी विकास मंत्री भरतशेठ गोगावले, महिला आणि बालविकास मंत्री अदिती तटकरे, मुंबै बँक अध्यक्ष व आ.प्रवीण दरेकर, महाडच्या माजी नगराअध्यक्षा स्नेहल जगताप-कामत, राजिप सदस्य चंद्रकांत कळंबे, कृष्णा कदम, नरवीर तानाजी मालुसरे यांच्या वंशजांच्या सुनबाई डॉ.शीतल मालुसरे, अनेक इतिहासतज्ञ, तसेच विविध राजकीय मंडळी, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर, पत्रकार, भाविक भक्त, शिवभक्त ह्या अखंड हरिनाम सप्ताह काळात भेट देणार असल्याचे कुडपण खुर्द ग्रामस्थांनी सांगितले.

## बेलोंडेखार गावात ‘बायोचार’बाबत प्रशिक्षण शिबिर

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

उरण तालुका कृषी अधिकारी अर्चना सुळ, नारनवर यांच्या अध्यक्षतेखाली जमिनीचा पोत सुधारण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे आवाहन तालुक्यातील शेतकऱ्यांनी शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जमिनीची सुपीकता टिकवून ठेवावी, या उद्देशाने बेलोंडेखार या गावामध्ये शेतकऱ्यांसाठी 'बायोचार' (Biochar) निर्मिती आणि वापराबाबत विशेष प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले होते.



कृषी विभागाचा पुढाकार

या प्रशिक्षणातून शेतकऱ्यांना टाकाऊ कचऱ्यापासून उपयुक्त खत कसे तयार करावे, याचे सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. बायोचार काळाची गरज या प्रशिक्षणाचे सहाय्यक कृषी अधिकारी विभावरी चव्हाण व बीटीएम नमिता वाकळे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांनी बायोचार म्हणजे काय, याची सविस्तर माहिती दिली.

पीक कापणीनंतर उरलेला कचरा न जाळता, त्यापासून शास्त्रीय पद्धतीने बायोचार तयार केल्यास जमिनीला कर्ब (Carbon) मिळतो आणि पाण्याची धारण क्षमता वाढते, असे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

बायोचारचे फायदे म्हणजे जमिनीचा पोत सुधारणे, सूक्ष्मजीवांची वाढ होणे आणि रासायनिक खतांवरील खर्च कमी होणे.निर्मिती पद्धती शेतातील काडीकचरा, पिकांचे अवशेष यांचा वापर करून कमी ऑक्सिजनमध्ये ते जाळून कोळसा (बायोचार) तयार करण्याची प्रात्यक्षिके दाखवण्यात आली.

वापर: हे खत पिकांना कशा प्रकारे द्यावे, याचे तांत्रिक नियोजन समजावून सांगितले. वेळी उपस्थित अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या शंकांचे निरसन केले आणि जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी सेंद्रिय शेतीकडे वळण्याचे आवाहन केले. तसेच शेतकऱ्यांनी ही आम्ही ह्या खरीप ला नक्कीच बायोचारचा उपयोग करू अशी ग्वाही दिली. प्रमुख उपस्थिती या कार्यक्रमाला कृषी विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची प्रमुख उपस्थिती होती.

यामध्ये तालुका कृषी अधिकारी आर.टी.नारनवर उप कृषी अधिकारी ए.डी.बुरकुल सहाय्यक कृषी अधिकारी, विभावरी चव्हाण. बीटीएम नमिता वाकळे, गावचे पोलीस पाटील दत्ताराम गोंधळी, तसेच गटाने शेती करणाऱ्या महिला शेतकरी उपस्थित होत्या.

## अमित घाग यांच्या वाढदिवसानिमित्त रोठ बुद्रुक येथे दिव्यांग नागरिकांचा सन्मान

**धाटाव : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाचे रोहा तालुकाध्यक्ष अमित घाग यांच्या वाढदिवसानिमित्त रोठ बुद्रुक येथे राजमुद्रा फाउंडेशनच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपत दिव्यांग नागरिकांचा सन्मान समारंभ उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास तालुक्यातील विविध गावांतील अनेक दिव्यांग बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



वाढदिवसानिमित्त प्रत्येक दिव्यांग बांधवाला भेटवस्तू देत सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमास भाजपाचे ज्येष्ठ नेते तथा माजी आमदार पंडित पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी अमित घाग यांच्या सामाजिक कार्याचा गौरव करत सांगितले की, दिव्यांग बांधवांसाठी शासनाच्या अनेक योजना उपलब्ध आहेत. मी जिल्हा परिषदेमध्ये कामकाज पाहत असताना दिव्यांग नागरिकांसाठी विविध योजना प्रभावीपणे राबविण्यात आल्या. भविष्यातही दिव्यांग बांधवांना कोणत्याही प्रकारच्या अडचणी आल्यास त्या रायगड जिल्हा परिषद तसेच समाज कल्याण विभागाच्या माध्यमातून निश्चितपणे सोडवण्यात येतील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

या कार्यक्रमास सुप्रसिद्ध ज्योतिषाचार्य डॉ. महेश देशपांडे यांची प्रमुख उपस्थिती होती. या वेळी अमित घाग यांनी आपल्या मनोगतात दिव्यांग बांधव हे समाजाची ताकद असून त्यांच्या आत्मसन्मानाला प्राधान्य देत आपण कायम त्यांच्या पाठीशी उभे राहू, अशी भावना व्यक्त केली.

या उपक्रमातून दिव्यांग बांधवांचा सन्मान तर झालाच मात्र त्यांना शासनाच्या योजना व हक्कांबाबत विश्वास व दिलासा देण्याचे कामही झाले. राजमुद्रा फाउंडेशनच्या या स्तुत्य उपक्रमाचे उपस्थितांनी मनापासून कौतुक केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्थानिक कार्यकर्ते व ग्रामस्थांनी सहकार्य केले . तर या वेळी दिव्यांग सेलचे भाजपाचे तालुकाध्यक्ष प्रदीप रटाटे, राजमुद्रा फाउंडेशनचे कार्याध्यक्ष राजेश भगत, महिला जिल्हा चिटणीस श्रद्धा घाग, युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस तथा भाजपाचे रोहा नगरपालिकेचे नवनिर्वाचित नगरसेवक रोशन चाफेकर, महिला मोर्चा अध्यक्ष रिया कासार, संयोग अपंग कल्याणकारी संस्था रोहा अध्यक्ष राजेश कांबळे, उपाध्यक्ष नंदलाल गुप्ता, सचिव रमेश खराडे, मोहिते काका, निवृत्त सुर्वे, जयश्री पुजारी यासह भाजपाचे बबलु सय्यद, नंदेश यादव , संदेश बामणे, तालुका सरचिटणीस कृष्णा बामणे, युवा मोर्चा तालुका अध्यक्ष नरेश कोकरे, धाटाव विभाग अध्यक्ष सचिन मोरे, सागर जोगडे, बिनदास धनावडे, ज्ञानेश्वर जाधव यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## खालापुरातील कंपनीमध्ये केमिकल्सच्या ड्रमचा स्फोट

**खालापूर : प्रतिनिधी**

खालापुरातील नारंगी (वावोशी) येथील एच पी कं या रसायन निर्माण करणाऱ्या कंपनीला रात्री ८ वा सुमारास आग लागली. या आगीत संपूर्ण कंपनी आगीच्या भक्ष्यस्थानी पडली. केमिकल्सने भरलेले ड्रममध्ये स्फोट होऊन धडाम धडाम असा कानठळ्या बसतील असा आवाज होत असल्याने संपूर्ण परीसरात भितीचे वातावरण पसरले होते. घटनास्थळी खोपोली अग्निशमन दल, टाटा कं, एमएनएस कंपनी मंगलम कंपनी, रिलायन्स इंडस्ट्रीज अशा ८ अग्निशमन दलाच्या फायर टेंडर घटनास्थळी दाखल होत आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करीत आहेत. अद्याप आग आटोक्यात आणण्यासाठी अग्निशमन दलाचे जवान आग शर्थीचे प्रयत्न करीत आहेत.

## हरित उपक्रमांमुळे जेएनपीएमध्ये वायुगुणवत्तेत लक्षणीय सुधारणा

**उरण : बातमीदार, वार्ताहर**

जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण जेएनपीए हे भारतातील सर्वात मोठे कंटेनर बंदर असून आपल्या कार्यक्षेत्रात सभोवतालच्या वायुगुणवत्तेत सातत्यपूर्ण सुधारणा नोंदवत आहे. अलीकडील वायुगुणवत्ता निर्देशांक (एक्यूआय) डेटाच्या तुलनेत सकारात्मक कल दिसून येत असून (एक्यूआय)मध्ये ठोस सुधारणा झाली आहे.



ही सातत्यपूर्ण घट जेएनपीएद्वारे राबविण्यात आलेल्या पद्धतशीर पर्यावरणीय हस्तक्षेप, हरित उपक्रम आणि सक्रिय निरीक्षण यंत्रणांची प्रभावी अंमलबजावणी दर्शवते. शाश्वत विकासाच्या दिशेने जेएनपीएची बांधिलकी अधिक बळकट होत असून पर्यावरणपूरक पायाभूत सुविधा आणि स्वच्छ तंत्रज्ञानावर भर देत बंदराने हरित भविष्याकडे महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत.

ऑक्टोबर ते डिसेंबर या कालावधीत मागील वर्षाच्या तुलनेत पीएम १० पातळीत सातत्यपूर्ण सुधारणा नोंदविण्यात आली. विशेषतः नोव्हेंबर आणि डिसेंबर महिन्यांत अनुक्रमे सुमारे ३३ टक्के आणि २९ टक्के इतकी लक्षणीय घट झाली असून, हिवाळ्याच्या उच्च कालावधीत धूळजन्य प्रदूषणात मोठ्या प्रमाणावर घट झाल्याचे हे स्पष्टपणे दर्शवते.

पीएम २.५ पातळीत मिश्र स्वरूपाचा कल दिसून आला. नोव्हेंबर महिन्यात पीएम २.५ मध्ये सुमारे २५ टक्के घट नोंदविण्यात आली असून, ही स्पष्ट सुधारणा दर्शवते. एकूणच आकडेवारीनुसार, हंगामादरम्यान मोठ्या आकाराच्या कणांमुळे होणारे प्रदूषण लक्षणीय प्रमाणात कमी झाल्याचे स्पष्ट होते.

बंदर परिसंस्थेतील हवा, पाणी तसेच इतर पर्यावरणीय घटकांचे सखोल व प्रभावी निरीक्षण सुनिश्चित करण्यासाठी जेएनपीएने अत्याधुनिक पर्यावरण प्रयोगशाळेची स्थापना केली आहे.

पान १ वरुन

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त ‘सीकेटी’त स्पर्धा

संस्थेचे सदस्य ॲड. राहुल घरत यांनी उद्घाटनपर भाषणात स्पर्धकांना नियमात राहून खेळाचा आनंद घ्या तसेच विद्यार्थ्यांना खेळाची गरज का आहे, खेळाचे जीवनात महत्त्व काय आहे हे पटवून दिले. प्रास्ताविकात प्राचार्य प्रशांत मोरे यांनी स्पर्धेच्या आयोजनाचा उद्देश स्पष्ट केला.

या स्पर्धेतील मुलींमध्ये सीकेटी माध्यमिक विद्यालय (मराठी माध्यम) नवीन पनवेल संघाने प्रथम क्रमांक, रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल खारघरच्या संघाने द्वितीय क्रमांक आणि सुधागड एज्युकेशन सोसायटी स्कूल कळंबोली संघाने तृतीय क्रमांक पटकाविला. मुलांमध्ये सीकेटी ज्युनिअर कॉलेज नवीन पनवेल प्रथम, रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल खारघर द्वितीय आणि सीकेटी माध्यमिक विद्यालय (मराठी माध्यम) संघाने तृतीय क्रमांक प्राप्त केला. संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख यांच्या हस्ते सर्व विजेत्या संघाना रोख बक्षीस, आकर्षक ट्रॉफी व सर्टिफिकेट देऊन गौरविण्यात आला. त्याचप्रमाणे सहभागी सर्व स्पर्धकांना प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

समारोपाच्या भाषणात वाय.टी. देशमुख यांनी सर्व विजेत्या संघाचे अभिनंदन केले व त्यांना भविष्यात मोठे क्रीडापटू खेळाडू बना, खिलाडूवृत्तीने खेळा अशा शुभेच्छा दिल्या.

ज्येष्ठ क्रीडा शिक्षक अरुण पाटील तसेच मनोज पाटील, माधवी कोळी यांनी स्पर्धेचे नियोजन केले. विज्ञान विभाग सहशिक्षिका अपर्णा मुकणे, योगिता जोरी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. विज्ञान विभाग सहशिक्षिका तृप्ती जोशी यांनी स्पर्धेचे व्हिडीओ चित्रण केले. शिक्षक, क्रीडा समिती सदस्य, परीक्षक, सर्व विद्यार्थी स्पर्धक यांच्या संयुक्त सहकार्याने स्पर्धा यशस्वी झाली.



## ‘स्कूल कनेक्ट’ अंतर्गत करिअर मार्गदर्शन

**उरण : रामप्रहर वृत्त**

तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय, फुंडे येथे बुधवारी (दि.१४) इयत्ता १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

वीर वाजेकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर यांनी ‘स्कूल कनेक्ट’ ही अभिनव संकल्पना राबविली असून, महाविद्यालय परिसरातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांसाठी या उपक्रमांतर्गत विविध शैक्षणिक व मार्गदर्शनपर उपक्रम राबविले जात आहेत.

या उपक्रमातून महाविद्यालयातील विषयतज्ज्ञ प्राध्यापक शाळांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात. तसेच शाळांच्या भौतिक सुविधा व विद्यार्थी पटसंख्या वाढीसाठीही सहकार्य केले जाते. या वेळी प्रा. डॉ. अनिल पालवे यांनी इयत्ता १२ वीच्या विद्यार्थ्यांना रसायनशास्त्र



विषयातील अभ्यासक्रम व करिअर संधी याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमास प्रा. डॉ. गिरीश ओक हे ही उपस्थित होते. हा कार्यक्रम विद्यालयाचे प्राचार्य बी. बी.साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे झाला.

कार्यक्रमास उपमुख्याध्यापिका संगीता थोरात, रयत सेवक को-ऑपरेटिव्ह बँकेचे संचालक प्रा. किशोर पाटील, प्रा. बाबुलाल पाटोळे, प्रा. झुंझार माने, प्रा. ऋषिकेश धुरी, कार्यालयीन प्रमुख नितीन म्हात्रे, नवनीत ठाकूर, प्रतिक वर्तक, प्रा. के. एच. सरोदे, प्रा. अरुण देवरे आदी उपस्थित होते.

## दुखवटा

### चंद्रभागा शिंगडे

**नागोठणे :** बाळसई गावातील चंद्रभागा दौलत शिंगडे यांचे वयाच्या ८०व्या वर्षी बुधवारी (दि.१४) त्यांच्या बाळसई येथील निवासस्थानी निधन झाले.



त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली असा परिवार आहे. कै. चंद्रभागा शिंगडे यांचा दशक्रिया विधी शुक्रवारी (दि.२३) व उत्तरकार्य सोमवारी (दि.२६) बाळसई येथे होणार असल्याचे शिंगडे परिवाराकडून सांगण्यात आले आहे.

# रसायनी पाताळगंगा एमआयडीसीतील रस्त्यांची दुरवस्था; नागरिकांचा जीव धोक्यात

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पाताळगंगा एमआयडीसी परिसरातील सिध्देश्वरी कॉर्नर, सिप्ला कॉर्नर, रिलायन्स, कॅस्ट्रोल, कैरे कॉर्नर, बिग कोला कंपनीच्या समोर मुख्य रस्त्यांची अवस्था दयनीय झाली आहे. मोठमोठे खड्डे, उखडलेला डांबर व फ्लेवर ब्लॉक रस्ता आणि अपुऱ्या सुरक्षित व्यवस्था यामुळे नागरिकांना अक्षरशः जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे.



या मार्गावरून दररोज हजारो कामगार, विद्यार्थी, स्थानिक नागरिक तसेच अवजड वाहनांची सतत ये-जा असते, मात्र रस्त्यांची दुरवस्था पाहता अपघातांचे प्रमाण वाढण्याची दाट शक्यता आहे. स्थानिक नागरिकांनी अनेक वेळा संबंधित प्रशासनाकडे तक्रारी करूनही अद्याप ठोस उपाययोजना झालेल्या नाहीत. रस्त्यांवर ना योग्य सूचना फलक, ना वेगमर्यादा दर्शविणारे बोर्ड, तसेच अनेक ठिकाणी स्पीड ब्रेकर असून त्याची अवस्था नसल्यासारखी झाले आहे व काही ठिकाणी स्पीड ब्रेकर नसल्यामुळे अपघातांना निमंत्रण मिळत आहे.

या परिसरात लहान मुले, शाळकरी विद्यार्थी व कामगार मोठ्या प्रमाणात प्रवास करतात. रस्त्यांच्या या दुरवस्थेमुळे त्यांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. प्रशासनाने तातडीने दखल घेऊन रस्ते दुरुस्ती, योग्य सिग्नल व्यवस्था व सुरक्षिततेच्या उपाययोजना राबवाव्यात, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

दरम्यान, प्रशासन याकडे कधी लक्ष देणार, की एखादा मोठा अपघात घडल्यानंतरच जाग येणार, असा सवाल आता नागरिक उपस्थित करत आहेत.

# मोहोपाडा कामगार नाक्यावर वाहतूक कोंडी, अपघातांना निमंत्रण

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

दांड-रसायनी रस्त्यावरील मोहोपाडा जनता विद्यालय वळणावर सकाळी कामगार मोठ्या प्रमाणावर रस्त्यामध्ये उभे राहत असल्याने रोजची वाहतूक कोंडी होत असून अपघातांना आमंत्रण मिळत आहे.



शिवाय सकाळी कंपनीमध्ये जाणाऱ्या बसेस सकाळी येत असल्यामुळे वाहतुक कोंडी नित्याचीच होवून बसली आहे. तसेच शाळेच्या विद्यार्थ्यांना शाळेमध्ये ने आण करणाऱ्या बसेस, रिक्षा याच वाहतुक कोंडी मध्ये अडकून राहतात. त्यामुळे शाळेच्या विद्यार्थ्यांना शाळेमध्ये वेळेवर न पोहचता रोज उशीर होत आहे. तसेच सकाळी मुलांना शाळेत घेऊन जाणाऱ्या महिलांना सुध्दा या गर्दीचा खुप त्रास सहन करावा लागत आहे. यातच रस्त्याच्या दोन्ही बाजूला रिक्षावाले बेकायदेशीर रिक्षा उभ्या करतात. रस्त्यावर कामगार उभे राहत असल्याने अपघात होत आहेत.

जनता विद्यालय वळणावरील सकाळी कामगार उभे राहण्याचे ठिकाण बदलून पर्यायी जागा मोहोपाडा येथील अचानकचे मैदान किंवा से. बी. रोड येथे करावी, अशी मागणी टाकेदेवी विद्यार्थी सेवाभावी संस्था रसायनी (नोंदणीकृत) यांनी रसायनी पोलीस, वासांबे ग्रुपग्रामपंचायत यांच्याकडे केली आहे.

## फोर्कलिफ्टचे चाक पोटावरून गेल्याने कामगाराचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलजवळील सोमाटणे गावाजवळ कोन-सावळा मार्गावर असलेल्या केरी इंडेव्ह लॉजिस्टिक कंपनीत घडलेल्या एका भीषण अपघातात एका कामगाराचा दुर्दैवी अंत झाला आहे.

मोहन गोमा म्हस्कर (वय अंदाजे ५५) असे या कामगाराचे नाव असून ते नारपोली गावचे रहिवासी होते. मिळालेल्या माहितीनुसार, मोहन म्हस्कर हे दुपारी सुमारे ३ वाजण्याच्या सुमारास कंपनीच्या आवारात काम करत होते. या वेळी कंटेनर उचलण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या फोर्कलिफ्ट वाहनाच्या मागील चाकाखाली ते अचानक सापडले. फोर्कलिफ्टचे चाक त्यांच्या पोटावरून गेल्याने ते गंभीर जखमी झाले.

अपघातानंतर सहकाऱ्यांनी तातडीने त्यांना बाहेर काढण्याचा प्रयत्न केला, मात्र तोपर्यंत त्यांचा अंत झाला होता. या दुर्दैवी घटनेमुळे म्हस्कर कुटुंबियांसह त्यांच्या केरी इंडेव्ह लॉजिस्टिकमधीलसहकारी कामगारांमध्ये शोककळा पसरली असून परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## विविध गुन्ह्यांमध्ये जप्त केलेल्या वाहनांचा होणार लिलाव

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहर पोलीस ठाणे येथे विविध गुन्हयांमध्ये एकूण आठ वाहने जप्त करण्यात आलेली असून सदर केसेसचा मा. न्यायालयात निकाल लागलेला आहे. वाहनांचे मुळ मालकांचा शोध घेतला, परंतु ते मिळून येत नाहीत. या गाड्या बऱ्याच कालावधीपासून पोलीस ठाणे आवारात पडून आहेत. त्यांचे मुळ मालक मिळून येत नसल्याने प्रत्यक्ष लिलाव प्रक्रिया केली जाणार आहे.

तत्पुर्वी वरील नमुद वाहनांचे मालकीबाबत आजपर्यंत कोणीही दावा दाखल केलेला नाही. मा. प्रादेशिक परिवहन अधिकारी खारघर यांचेकडे उपलब्ध वाहनांचे आरटीओ रजि. नंबर, इंजिन नंबर, वेसीज नंबरची पडताळणी केली असता सदर वाहनांचे मालक मिळून आले नाहीत.

गुन्हयातील जप्त वाहने ही भंगारात क्रश करून त्याचा लिलाव करण्याची मा. न्यायालयाने परवानगी दिली असून सदर वाहनांचा २० जानेवारी २०२६ रोजी ११ वा. तळोजा पोलीस ठाण्याचे शेजारी ईएमसी सेंटर येथे लिलाव होणार आहे. त्यासाठी इच्छुक भंगार परवानाधारक यांनी १९ जानेवारी २०२६ रोजी पर्यंत निवीदा पनवेल शहर पोलीस ठाणे येथे सादर कराव्यात असे आवाहन वपोनि नितीन ठाकरे यांनी केले आहे.

## पनवेलमध्ये आज सुरक्षित वाहतूक मार्गदर्शन शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विद्यार्थी वाहक संस्था, पनवेल यांच्या वतीने आयोजित राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियान जानेवारी २०२६ अंतर्गत सुरक्षीत वाहतूक मार्गदर्शन शिबिर कार्यशाळेचे आयोजन रविवारी (दि.१८) करण्यात आले आहे.

प्रादेशिक परिवहन कार्यालय, वाहतुक पोलीस विभाग पनवेल कळंबोली, काळण समाज मध्यवर्ती याच्या संयुक्त विद्यमाने रविवारी ही कार्यशाळा काळण समाज, मध्यवर्ती सभागृह, ठाणानाका रोड, पनवेल येथे होणार आहे. या कार्यशाळेदरम्यान सकाळी स्कूल बस व व्हॅन रॅली निघणार आहे. गरजु विद्यार्थ्यांना वह्या वाटपही करण्यात येणार आहे.

कार्यशाळेचे प्रमुख पाहुणे म्हणून आमदार प्रशांत ठाकूर, आमदार विक्रांत पाटील, महाराष्ट्र प्रदेश वाहतूक संघटना अध्यक्ष प्रभुदास भोईर, बळीराज सेना पक्षाअध्यक्ष अशोक वालम, सामाजिक कार्यकर्ते हरिष बेकावडे, काळण समाज मध्यवर्ती अध्यक्ष सुखदेव राजाराम तेजे, रवींद्र गोसावी ठाकूर असणार आहेत. तर प्रमुख मार्गदर्शक ग्लोबल रोड ॲण्ड इन्हरमेंट सेफ्टी या संस्थेचे सारथी सुरक्षा सेवा प्रवक्ते विनय मोरे आहेत. यासोबतच पोलीस आयुक्त प्रशांत मोहिते, प्रादेशिक परिवहन अधिकारी जयंत चव्हाण, पनवेल शहर वपोनि नितीन ठाकरे, वाहतूक शाखा वपोनि औदुंबक्षर पाटील, कळंबोली वाहतूक विभाग वपोनि अजय भोसले, मोटार वाहन निरीक्षक पृथ्वीराज काकडे यांचेही मार्गदर्शन लाभणार आहे.

या कार्यक्रमावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर, पालकवृद शाळा मुख्याध्यापक, शिक्षकवर्ग, विद्यार्थी, हितचिंतक, पत्रकार बंधू तसेच विद्यार्थी वाहतूकदार सघटना पदाधिकारी, व स्कूल बस चालक-मालक, परिचारीका यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन अध्यक्ष पांडूरंग सदाशिव हुमणे व सर्व पदाधिकारी व सभासद यांनी केले आहे.

# सीकेटी महाविद्यालयात बोलीभाषेचा जागर

### ◆ मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्ताने कार्यक्रमांचे आयोजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण संस्थेचे चांगू काना ठाकूर कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, मराठी भाषा संचालनालय आणि महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचे आयोजन सोमवार, १९ जानेवारी २०२६ रोजी महाविद्यालयाच्या प्रांगणात करण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्याच्या भाषा संचालनालयाच्या वतीने दरवर्षी १४ ते २८ जानेवारी या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात येतो. याचेच औचित्य साधून रायगड जिल्ह्यामध्ये आगरी बोलीचा जागर हा कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. मराठी साहित्य संस्कृतीविषयी जनजागृती करण्याच्या उद्देशाने महाविद्यालयाच्या परिसरात सकाळी ठीक ९ वाजता ग्रंथदिंडी आणि शोभा यात्रा निघणार आहे. त्यानंतर ठीक १० वाजता बोलींचा जागर या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमात ज्येष्ठ साहित्यिक आणि आगरी भाषा अभ्यासक चंद्रकांत मढवी तसेच ज्येष्ठ लेखक व नाटककार मोहन भोईर हे मार्गदर्शन करणार आहेत. त्याचबरोबर आगरी बोलीभाषेतील विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण या प्रसंगी केले जाणार आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.के.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी आसपासच्या परिसरातील महाविद्यालयांनादेखील निमंत्रण देण्यात आले आहे. सर्व मराठी भाषकांनी आपली संस्कृती आणि आगरी बोलीचा जागर करण्यासाठी या कार्यक्रमांमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख प्राध्यापक एम.एम. अंबुलगेकर आणि सहाय्यक प्रा. नम्रता कडू यांनी केले आहे.

## अरुण म्हात्रेंचा पुरस्काराने सन्मान

**उरण : रामप्रहर वृत्त**



आगरी सेवा संघ वरळी मुंबई यांच्या विद्यमाने आगरी महोत्सव झाला साजरा झाला. यामध्ये कवी अरुण द. म्हात्रे. यांना आगरी समाज भूषण-२०२५ पुरस्काराने गौरविण्यात आले.

श्री. म्हात्रे यांना काव्य लेखन, साहित्य, कला, वाद्य वादन अशा विविध क्षेत्रात यापूर्वी तालुका, जिल्हा, राज्य, राष्ट्र तसेच आंतरराष्ट्रीय (जागतिक) अशा सर्व पातळीवर सन्मानित करून गौरविण्यात आले आहे. २०२५ या वर्षात त्यांना जळगाव येथे- राज्यस्तरीय समाज चिंतामणी पुरस्कार ; कोल्हापूर येथे-राष्ट्रीय विश्वकर्मा पुरस्कार तसेच पुणे येथे- राष्ट्रीय अष्टपैलू भारत भूषण पुरस्कार प्राप्त झाले. हे समाजासाठी अभिमानास्पद, गौरवास्पद असल्याने आगरी सेवा संघाचे अध्यक्ष प. सा. म्हात्रे व कार्यकारिणी यांनी अरुण म्हात्रेंच्या कलागुणांची योग्य दखल घेतली व त्यांना आगरी समाज भूषण पुरस्कार २०२५ सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला. श्री. म्हात्रे यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# नवनिर्वाचित नगरसेवकांनी घेतले लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे आशीर्वाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या निवडणुकीत भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी, आरपीआय महायुतीने ऐतिहासिक विजय संपादन करत महापालिकेवर आपले वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. महायुती सरकारने शहरात राबवलेली विकासकामे आणि जनहितार्थ घेतलेल्या निर्णयांना मतदारांनी पसंती दर्शवल्याचे या निकालातून स्पष्ट झाले आहे. प्रत्येक प्रभागातून महायुतीच्या उमेदवारांना मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभल्याने विरोधकांचा सुपडा साफ झाला आहे. या विजयानंतर नवनिर्वाचित नगरसेवकांनी माजी खासदार आणि लोकनेते रामशेठ ठाकूर यांची शनिवारी सदिच्छा भेट घेऊन त्यांचे आशीर्वाद घेतले.

या वेळी रामशेठ ठाकूर यांनी सर्व नवनिर्वाचित लोकप्रतिनिधींचे अभिनंदन केले आणि त्यांना पुढील जनसेवेच्या कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी प्रभाग क्रमांक ४ चे नगरसेवक प्रवीण पाटील, परेशा पटेल, अनिता पाटील, मधू पाटील, प्रभाग क्रमांक ९ मधील महादेव मधे, प्रतिभा भोईर, दमयंती भोईर, शशिकांत शेळके, प्रभाग १९ चे नगरसेवक सुमित झुंझारराव, राजू सोनी, प्रभाग १६चे समीर ठाकूर, प्रभाग १२चे दिलीप पाटील, कुसूम पाटील, प्रभाग १३च्या नगरसेविका हेमलता गोवारी, शीला भगत, प्रभाग ६चे नगरसेवक नरेश ठाकूर, उषा अडसुळे, सोनल नवघरे, समीर कदम, प्रभाग ८ चे नगरसेवक बबन मुकादम, रामदास शेवाळे, प्रभाग १३चे विकास घरत आणि रविंद्र जोशी यांनी या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेऊन आशीर्वाद घेतले.

भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, माजी सभागृहनेते परेश ठाकूर, अर्चना ठाकूर, सुधाकर पाटील, प्रकाश पाटील, माजी नगरसेवक विजय चिपळेकर, रवींद्र म्हात्रे, जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, भाऊ भगत, वासुदेव पाटील, प्रभुदास भोईर, सुरेश भोईर, सुभाष भोईर, निलेश भोईर, जय पावणेकर आदी उपस्थित होते.













# साऊथच्या पाहुण्यांनी मराठीतही खाल्ला भाव...









झूम प्रहर



दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक

दक्षिणेकडील प्रादेशिक भाषेतील चित्रपटामधील कलाकार मुंबईत आले आणि त्यांनी चक्क भाव खाल्ला असे घडलंय. तुम्हालाही माहित्येय आपल्या घरी आलेल्या पाहुण्यांचे मनापासून स्वागत करणे ही तर आपली संस्कृती. मग तो साऊथ इंडियन चित्रपटसृष्टीतील चेहरामोहरा का ना असेना?

(कॉफी शॉपमध्ये भेटूया यात आत्मियता नाही. डिहिटल पिढीतील हे फॅड जेन झी पिढीतही रूजलंय. सिधा पॉईट पे आ जाओ असा या पिढीचा रोखठोक बाणा आहे) 'पिक्चरच्या जगात' तर 'स्टार पाहुणा' हा कुठेही गेला तरी लक्ष वेधून घेणारच. सगळ्यांच्या नजरा खिळवून घेतो म्हणा. अशीच एक स्टार गेस्ट रश्मिका मंदाना. नावातच सगळं ग्लॅमर आलं. आयडेन्टीडी आली. बाकीचे प्रगती पुस्तक पुन्हा वेगळे सांगायलाच नको. झी गौरव पुरस्कार सोहळ्यात सगळ्यात जास्त तीच भाव खाऊन तिकडे दक्षिणेकडे गेलीदेखील. ज्यांनी या शोचा लाईव्ह अनुभव त्यातील अनेकांना ही कायमची सुखद आठवण आहे, ज्यांना या पुरस्कार सोहळ्याचा शो घरबसल्या टीव्ही अथवा मोबाईलवर ही एन्टरटेन्मेन्ट एन्जॉय केला, त्यामुळे टीआरपी वाढला.

साऊथचा स्टार मराठी इव्हेन्टसमध्ये येऊन भाव खाऊन जाणे याचाही एक सुखद फ्लॅशबॅक आहेच. असेच ते पाहुणे म्हणून आले आणि आपलं अस्तित्व अधोरेखित करण्यात यशस्वी ठरले. स्टार हा कुठेही गेला तरी स्टारच असतो मग तो दक्षिणेकडून आलेला का ना असे?

अशीच एक खास आठवण... १९९३चा महाराष्ट्र राज्य चित्रपट महोत्सव पुरस्कार सोहळा... स्थळ दक्षिण मुंबईतील रंगभवन, धोबी तलाव. (त्या काळात राज्य चित्रपट महोत्सव रंगभवनच्या मोकळ्या म्हणजे ओपन एअर सभागृहात रंगे.)

या सोहळ्याचे विशेष म्हणजे, मराठी पुरस्कार सोहळ्यात नामांकन पद्धत सुरू झाली. तोपर्यंत सगळेच घोषित निकाल असत आणि फक्त विजेतेच तेवढे हजर राहत. आता या 'शो'चा रंगढंग बदलला. झगमगाट, ग्लॅमर, अधिक प्रमाणात गीत, संगीत, नृत्य, व्हिडिओ शूटिंग यांची रेलचेल आले.

या महोत्सवाने आपलं एकूणच व्यक्तिमत्व, लूक बदलले असता त्यासाठी 'प्रमुख पाहुणा'ही तसाच भारी लक्षवेधक हवा ना? तो होता, कमल हसन.

आता तो दक्षिणेकडील शिस्त आणि सवयीप्रमाणे या इव्हेन्टला वेळेवर आला आणि अगदी शांतपणे एकेक पुरस्कार आणि दरम्यानचा शो बघत होता. तो आला हेच विशेष होते. पण त्याला 'मराठीतील सोहळ्यातील' भाषा वगळता बाकीचे सगळेच समजत असणार याची आम्हा उपस्थितांना जणू खात्री होती.

आम्हा सिनेपत्रकारांना त्याच्यामागचीच तिसरी रांग दिली असल्याने कमल हसनचे हावभाव दिसत होते. थोडे अवघडलेपण होते त्यात असं उगाच वाटलं. एक पुरस्कार देण्यासाठी त्याला स्टेजवर बोलावले तेव्हा त्याला बोलायची संधी दिली नाही, शेवटी ती दिली जाईल असे निवेदक त्याला समजावे म्हणून इंग्रजीत म्हणाला. त्यावर छान हसून कमल हसनने दाद दिली. कमल हसनच्या मंद हसण्यावरही अनेक जण फिदा आहेत ते प्रत्यक्षात दिसले.

अखेरीस ती वेळ आली. कमल हसनने स्टेजवरून समोरच्या उघड्या प्रेक्षागृहावर नजर फिरवली... आणि एकेक शब्द हळूहळू जोडत जोडत मराठीत बोलायला सुरुवात केली. अर्थात, क्षणात प्रचंड टाळ्या पडल्याच (अशी कोणत्याही क्षेत्रातील खूप खूप मोठी माणसं मराठीत बोलली की मराठी मन आनंदणे स्वाभाविक आहे. रोहित शेट्टीच्या मराठीत बोलण्याचे कौतुक वाटतयं ना?). आपण लहानपणी काही काळ सोलापूरला राहिल्याने थोडं थोडं मराठी बोलता येते असे म्हणतच त्याने छान इंग्रजीत बोलायला सुरुवात केली... बातमी झाली हो. कमल हसनने मराठीत भाषणाला सुरुवात केली केवढा मोठा सुखद धक्का हो. आजही तो लक्षात आहे.

कमल हसनचा असा मराठीशी संबंध आला मग रजनीकांतचे काय असा काहींच्या मनात प्रश्न आला असेलच. तो मूळचा शिवाजीराव गायकवाड. म्हणजे महाराष्ट्रीय. त्याला मराठीची ओढ असणारच. फक्त योग यायला हवा. निर्माते आनंद गायकवाड व बाबा ईस्माईल मिस्त्री यांनी तो आणला. तो सुखद योग आला, पुरुषोत्तम बेर्डे दिग्दर्शित विकी फिल्म्सच्या 'एक फूल चार हाफ'(१९९१) या मराठी चित्रपटाच्या मुहूर्ताला. गोरेगावच्या फिल्मीस्थान स्टुडिओत रजनीकांतच्या हस्ते हा मुहूर्त होताना तो आणि मराठीतील सुपर स्टार लक्ष्मीकांत बेर्डे हे एकत्र आले. मुहूर्ताचे दृश्य लक्ष्मीकांत बेर्डे आणि प्रिया अरुण यांच्यावर झाले. त्या काळात मुद्रित माध्यमे होती. चॅनेलचे जग असते तर या मुहूर्ताचे लाईव्ह कव्हरेज झाले असते. रजनीकांतचे साऊथ ढंगाचे मराठी बोल सर्वाधिक व्हिज्यु आणि लाईक्स मिळवणारे शो रिल ठरले असते. कौतुक असते हो अशा गोष्टीचे. 'श्रीवल्ली' रश्मिका मंदानाने मराठमोळ्या लावणीवर नृत्याचा ठेका, ठेचा धरल्याचेही लय भारी कौतुक वाटले तसेच ते आहे.

आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल मिडियातून अन्य भाषेतील चित्रपट, सेलिब्रिटीज, म्युझिक यांचा ओघ वाढलाय. महाराष्ट्रीय चित्रपट रसिकांना साऊथच्या चित्रपट संस्कृतीची ओळख वाढतेय. 'नाटू नाटू'ने नाते आणखी घट्ट केलेय. भविष्यात मराठी चित्रपटाच्या इव्हेन्टसमध्ये साऊथचा तडका वाढला तर आश्चर्य नाही. म्हटलं ना, पाहुण्याचे स्वागत करणे ही आपली संस्कृती आहे आणि अशा पाहुण्यांचे मनापासून स्वागत आहे.


लक्ष्मण उत्तेकर दिग्दर्शित छावा (२०२५) या भव्य दिव्य दिमाखदार ऐतिहासिक चित्रपटाच्या निमित्ताने विकी कौशलसोबत रश्मिका मंदाना शिर्डी येथील साईबाबा मंदिरात दर्शनासाठी गेली असता उपग्रह वाहिन्यांच्या प्रतिनिधींनी तिला मराठीत बोलण्याची विनंती केली असता विकी कौशल अगदी तत्परतेने तिच्या मदतीला धावून आला आणि ती शब्द जोडून जोडून मराठीत बोलली याची चक्क बातमी झाली. डिजिटल मीडियात या बातमीला मोठ्याच प्रमाणावर लाईक मिळाले. कॉमेन्टस आल्या. साऊथचा स्टार मराठीत बोलल्याचा हा सुपरिणाम आहे.

एकदा तर झी मराठी मनोरंजन वाहिनीच्या एका सोहळ्यात डॉ. निलेश साबळेने याच रश्मिका मंदानाला विचारलेल्या प्रश्नांना बरं बरं मराठीत बोलून मराठीत उत्तरे दिली. इतकेच नव्हे तर ती मला जाऊ दे ना घरी या सुपर ड्युपर हिट गाण्यावर पक्कडबाज लावणी नृत्य सादर करून दाद मिळवली. एखाद्या पारंपरिक मसालेदार मनोरंजक चित्रपटातही रश्मिका मंदाना एकदम फाकडू नृत्य नक्कीच नाचेल. फार तर चित्रपटाचे बजेट वाढेल, पण त्याची परतफेड भन्नाट असेल त्याचं काय? पेराल तसं उगवेल आणि आज या साऊथच्या सेलिब्रेशजना सोशल मीडियात अगणित महाराष्ट्रीय फॉलोअर्स आहेत. किशोर बेळेकर दिग्दर्शित गांधी टॉक्स या संवादरहित चित्रपटात विजय सेतुपती यांच्यासोबत काम करताना उषा नाडकर्णी आणि नारायण जाधव हे महाराष्ट्रीय कलाकार कलालीचे इम्प्रेस झाले.

याचीच परतफेड म्हणून आपल्या सुबोध भावे अथवा अमृता खानविलकरला दक्षिणेकडील इव्हेन्टसमध्ये असेच पाहुणा म्हणून भाव खायला मिळू देत. ऐवीतेवी सयाजी शिंदे, रवि काळे, अतुल कुलकर्णी, सचिन खेडेकरपासून श्रृती मराठे, नेहा पेंडसे, अंजली पाटील, राधिका आपटेपर्यंत अनेक मराठी चेहरे मोहरे तमिळ, कन्नड, तेलगू भाषेतील चित्रपटात आहेत, त्यांना तेथील इव्हेन्टसचे पाहुणे होण्याचा योग येऊ देत. मराठी सेलिब्रिटीज दुकानाचे उद्‌घाटन असो, पुरस्कार सोहळा असो, एन्टरटेन्मेंट इव्हेंटस असो, आपले मराठी कलाकार निश्चित छा जाऊ शकतात. मराठी सेलिब्रिटीजचा फिटनेस, आत्मविश्वास, आधुनिक फॅशन सेन्स, इंग्रजीत बोलणं भन्नाट आहे. ते मल्टीप्लेक्स फोर डी, व्हीएफएक्स आणि एआय तंत्रज्ञानाचा भरपूर वापर केला जात असलेल्या पिढीचे कलाकार आहेत. पूर्ण व्यावसायिक शिस्त असणारेही आहेत. ते एखाद्या चौकटीत अडकुन राहू इच्छित नाही.

आजच्या फिल्मी जगात ग्लॅमरची देवाणघेवाण महत्त्वाची... आज आपण मल्टीप्लेक्सला जावं तर मराठी व हिंदी चित्रपटासह साऊथचा धमाकेदार धमाकेदार चित्रपट, गुजराती चित्रपट, जगभरातील अनेक भाषेतील चित्रपट असं बरंच काही पहायला मिळतेय (ही सबटायटल्सची कृपा), ओटीटीवरही जगभरातील अनेक भाषेतील कन्टेन्ट (चित्रपट, वेबसिरिज) पहायला मिळतोय. आज मनोरंजन क्षेत्रात भाषेच्या भिंती मोडून पडल्यात. आजच्या जेन झी पिढीकडून या सगळ्या स्थित्यंतराचे सकारात्मक स्वागत आहे आणि तेच तर महत्त्वाचे असते.

# थोर समाजसुधारक न्यायमूर्ती रानडे



महादेव गोविंद रानडे हे महाराष्ट्रातील थोर समाजसुधारक, अर्थशास्त्रज्ञ व ब्रिटिश भारतामधील न्यायाधीश होते. शिक्षणाचा प्रसार व्हावा, स्त्रियांनाही शिक्षण घेता यावे यासाठी त्यांनी मुलींच्या शाळा सुरू केल्या. त्यांनी शिक्षण, समाजसेवा, राजकारण तसेच आर्थिक बाबतीत अमूल्य कार्य केले. त्यांची आज जयंती

महादेव गोविंद रानडे यांचा १८ जानेवारी १८४२ जन्म नाशिकमधील निफाड या गावी झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण कोल्हापुरात झाले. १८५६ नंतर ते आणि त्यांचे मित्र विनायक जनार्दन कीर्तने मुंबईत शिक्षणासाठी एल्फिन्स्टन हायस्कूलमध्ये दाखल झाले. इतिहास आणि अर्थशास्त्र हे त्यांचे आवडीचे विषय राहिले. मॅट्रिक, एमएनंतर ते १८६६ साली ते कायद्याची परीक्षा उत्तीर्ण झाले. मुंबई विद्यापीठाचे पहिले भारतीय फेलो म्हणून त्यांची निवड झाली.

रानडे यांचा पहिला विवाह १८५१ साली वयाच्या ११-१२व्या वर्षी वाईतील दांडेकरांच्या रमा नावाच्या मुलीशी झाला, पण त्यांचे १८७३ साली निधन झाले. माधवरावांचे विधवांच्या पुनर्विवाहासंबंधीचे विचार आणि त्या चळवळीतील त्यांचा सहभाग लक्षात घेता ते एखाद्या विधवेशी लग्न करतील अशी अटकळ त्यांच्या वडिलांनी बांधली आणि त्या सालच्या नोव्हेंबरच्या ३० तारखेला अण्णासाहेब कुर्लेकर यांच्या कन्येशी त्यांनी माधवरावांचा विवाह करून दिला. लग्नानंतर माधवरावांनी या पत्नीचे नावही रमा असेच ठेवले. पुढे त्यांनी रमाबाईंना शिकवले.

१८७८ साली पुणे येथे झालेल्या पहिल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनचे ते अध्यक्षही होते. १८८५मध्ये ते मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती झाले. न्या.रानडे यांना आधुनिक भारताच्या इतिहासात महाराष्ट्रातील समाजसुधारणा चळवळीत महत्त्वाचे स्थान आहे. त्यांनी स्वातंत्र्यासाठी व सामाजिक सुधारणांसाठी कायम घटनात्मक व सनदशीर मार्गांचा पुरस्कार केला. स्वातंत्र्यपूर्व काळातील 'मवाळ' प्रवाहाचे ते नेते होते. त्यांनी भारतीय राजकारणात अर्थशास्त्रीय विचार आणला. स्वदेशीच्या कल्पनेला त्यांनी शास्त्रशुद्ध व व्यावहारिक स्वरूप दिले. त्यांनी भारतातील दारिद्र्याच्या प्रश्नाचे मूलभूत विवेचन करून येथील दारिद्र्याची कारणे व ते दूर करण्याचे उपाय यासंबंधी अभ्यासपूर्ण विचार मांडले.

भारतीय समाजात संकुचित वृत्ती, जातिभेदांचे पालन असे दोष दूर करूनच आपल्या समाजाची प्रगती साधता येईल असे त्यांचे ठाम मत होते. ज्याप्रमाणे गुलाबाचे सौंदर्य व सुगंध हे जसे वेगळे करता येत नाहीत, त्याप्रमाणे राजकारण व सामाजिक सुधारणा यांची फारकत करता येत नाही असे त्यांचे मत होते. हे विचार त्यांनी समाजसुधारणा चळवळीच्या अगदी सुरुवातीच्या काळात मांडल्यामुळे त्यांना 'भारतीय उदारमतवादाचे उद्गाते', असेही म्हटले जाते.

३१ मार्च १८६७ रोजी न्यायमूर्ती रानडे, डॉ. आत्माराम पांडुरंग, डॉ. रा. गो. भांडारकर, वामन आबाजी मोडक इत्यादी मंडळींनी पुढाकार घेऊन मुंबईत प्रार्थना समाजाची स्थापना केली. समाजसुधारणांसाठी रानडे यांनी पुढाकार घेऊन भारतीय सामाजिक परिषदेची स्थापना केली. जातिप्रथेचे उच्चाटन, आंतरजातीय विवाहांस परवानगी, विवाहाच्या वयोमर्यादेत वाढ, बहुपत्नीकत्वाच्या प्रथेस आळा, विधवा पुनर्विवाह, स्त्री-शिक्षण, तथाकथित जाति-बहिष्कृत लोकांच्या स्थितीत सुधारणा, हिंदू-मुसलमानांच्या धार्मिक मतभेदांचे निराकरण अशा या संस्थेच्या मागण्या होत्या.

अनेक घटनांच्या संदर्भात न्यायमूर्ती रानडे यांना टीका सहन करावी लागली. त्यांच्या कामांबद्दल लोकांमध्ये रोष होता कारण तेव्हा समाजसुधारकांना फार विरोध होई. माधवरावांच्या या समाजसुधारकी कामालाही सनातनी वर्गाकडून सतत विरोध झाला. माधवरावांनी तो विरोध सहनशीलतेने आणि समजुतीने हाताळला.

रानडे यांनी १६ जानेवारी १९०१च्या रात्री जस्टीन मेकार्थी याचे 'हिस्ट्री ऑफ अवर ओन टाईम्स' हे पुस्तक वाचायला घेतले आणि पुस्तक वाचायला बसले नाहीत तोच त्यांना त्रास सुरू झाला व त्यांची जीवनयात्रा संपली. (साभार : वेबदुनिया)

# साहित्यिक, कवी आणि शिक्षणतज्ज्ञ वि.द. घाटे

मराठी लेखक, कवी, शिक्षणतज्ज्ञ अशी वि.द. घाटे यांची ओळख. त्यांची आज जयंती.. घाटे यांचा जन्म १८ जानेवारी १८८९ रोजी अहमदनगर (आताचे अहिल्यान-गर) जिल्ह्यातील घोसपुरी या गावी. त्यांचे आजोबा कोंडो राणोजी हे प्रार्थनासमाजाचे पुढारी होते, तर प्रसिद्ध कवी दत्त हे त्यांचे वडील.



वि.द. घाटे यांचे प्राथमिक शिक्षण नगरला, माध्यमिक व उच्च शिक्षण इंदूर येथे झाले. मुंबई व लंडन येथील शिक्षणशास्त्राच्या पदव्या त्यांनी मिळविल्या. मुंबई इलाख्याच्या शिक्षणखात्यात विविध अधिकारपद-ांवर नोकरी करून शेवटी डेप्युटी डिरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन या पदावरून निवृत्त झाले (१९५०).त्यांनी शालेय पुस्तके, शैक्षणिक ग्रंथ, कविता, व्यक्तिचित्रे, ललित निबंध, आत्मवृत्त, नाटक इ. विविध प्रकारचे लेखन केले. शिक्षण आणि व्यवसाय यांच्या निमित्ताने महाराष्ट्र, माळवा, गुजरात, कर्नाटक अशा विविध प्रदेशांत तसेच परदेशातही वास्तव्य घडल्याने त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला बहुरंगीपणा आला. त्यांच्या जी-वनविषयक व्यापक आणि समृद्ध जाणिवांचा प्रत्यय त्यांच्या लेखनात येतो.

रविकिरण मंडळाचे ते सदस्य होते. प्रथम 'मधुकर' या टोपणनावाने ते कविता करीत. मधु-माधव (१९२४) या संग्रहात माधव ज्युलिअन यांच्याबरोबर त्यांच्याही कविता संग्रहित झालेल्या आहेत. नाट्यरूप महाराष्ट्र (१९२६), नाना देशांतील नाना लोक (१९३३) ही शालेय पुस्तके काही म्हातारे व एक म्हातारी (१९३९), पांढरे केस, हिरवी मने (१९५९) हे व्यक्तिचित्रांचे संग्रह मनोगते (१९६६), विचारविलसिते (१९७३) हे ललित-वैचारिक निबंधाचे संग्रह दिवस असे होते (१९६१) हे आत्मचरित्र, ही त्यांची ग्रंथसंपदा विशेष उल्लेखनीय आहे. याशिवाय टीचिंग ऑफ हिस्टरी (१९३८), इतिहास : शास्त्र आणि कला (१९५८), यशवंतराव होळकर (नाटक, १९६२), बाजी व डॅडी (नाटिका, १९६४), तांबडं फुटलं (१९६९) ही पुस्तकेही त्यांनी लिहिलेली आहेत. त्यांचे पुष्कळसे लेखन स्व-न्तःसुखाय झालेले आहे. त्यांचे उत्कट पण दिलखुलास व्यक्तिमत्त्व, सौंदर्यदृष्टी, इतिहासप्रेम, जीवनाविषयीची आंतरिक ओढ आणि अभिजात रसिकता यांचा त्यात मिलाफ झालेला दिसतो. त्यांची गद्यशैलीही सुटसुटीत, रसपूर्ण आणि लयदार आहे. १९५३ साली अहमदाबाद येथे भरलेल्या मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा बहुमान त्यांना लाभला होता.

**-स.गं. मालशे** (मराठी विश्वकोष)

# नाट्यछटाकार शंकर गर्गे उर्फ दिवाकर



दिवाकर म्हणजेच शंकर काशिनाथ गर्गे हे काही रूढार्थाने नाटककार नव्हेत, तर काही नाटके, नाटिका त्यांनी लिहिल्या. फ्रेंच नाटककार मॉरिस मायटरलिंक यांचे एक नाटक मराठीत अनुवादीतदेखील केले. तरीही दिवाकर म्हटले म्हणजे आठवतात त्या त्यांनी लिहिलेल्या नाट्यछटाच. त्यांची आज जयंती (जन्म १८ जानेवारी १८८९)

शेक्सपिअर, गॉल्सवर्दी, ब्राउनिंग, इ. युरोपीय लेखकांच्या साहित्याचे दिवाकर यांनी केवळ वाचनच केले नव्हते तर त्यांचा अगदी तपशीलवार अभ्यास केला होता. ब्राउनिंग या लेखकाने काही नाट्यात्म एकभाषिते लिहिली होती. त्या धर्तीवर मराठीत काही लिहावे या हेतूने त्यांनी नाट्यछटा लिहिल्या. नाट्यछटा म्हणजे एक छोटेखानी, एकपात्री स्वगतासारखा प्रकार. आपल्या शेजारी एक किंवा काही पात्रे आहे अशी कल्पना करून नाट्यछटा सादर करणारा त्यांच्याशी संवाद साधत असतो, त्याचे संवाद तो मोठ्याने म्हणत असतो, त्यावर शेजारच्याची प्रतिक्रिया काय म्हणालात.. अशी सुरुवात करून स्वतःच म्हणत असतो. त्यामुळे वरपांगी हे स्वगत वाटत असले तरी सुप्त स्वरूपातील संवाद असल्यामुळे नाट्यछटा हा प्रकार अत्यंत नाट्यपूर्ण असतो. नाट्यछटा हा अगदी छोटेखानी नाट्यप्रकार, त्याचा विस्तार आणि त्याचा कालावधी हा मर्यादित स्वरूपाचा असतो, फारफारतर पन्नास-पंचावन्न ओळींचा, पण या मर्यादित अवकाशातही अतिशय वेधक पद्धतीने प्रसंगाचे वर्णन केलेले असते.

दिवाकरांनी लिहिलेली पहिली नाट्यछटा १५ एप्रिल १९१३च्या केसरी या वर्तमानपत्रातून प्रसिद्ध झाली आणि मराठी साहित्याला, रंगभूमीला नाट्यछटा हा नाट्यप्रकार मिळाला. साहित्यप्रकार म्हणून आरंभ झालेला हा प्रकार खरा नाट्यप्रकारच होय. नेमके व्यक्तिरेखाचित्रण, भावनांचा जिवंतपणा, जगण्यातील विसंगती, विरोध, इ. बाबींचा वापर करून दिवाकरांनी नाट्यछटांमध्ये नाट्यात्मता साधली. अत्यंच आटोपशीर असलेल्या या प्रकारातून दिवाकरांनी मानवी स्वभावाचे आणि वर्तनाचे तसेच विसंगतीयुक्त समाजव्यवहाराचे मोठे मार्मिक दर्शन घडविले आहे. विनोद, उपरोध, नेमके मनोविश्लेषण आणि नाट्यात्मकतेची जाण ही त्यांच्या लिखाणाची वैशिष्ट्ये होत. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे त्यांच्या लिखाणातून तत्कालीन सामाजीकतेचे दर्शन घडते हे जेवढे खरे आहे, तेवढेच त्यांच्या लिखाणातील अनेक गोष्टी खरे तर अत्यंत आधुनिक आणि म्हणूनच त्यांच्या काळाच्या पुढच्या वाटतील अशा होत्या, त्या जाणिवा नंतर स्वातंत्र्योत्तर काळात मोठ्या प्रमाणावर व्यक्त झाल्या. दिवाकर महत्त्वाचे ठरतात ते यामुळे.

'कोकीळाबाई गोडबोले', 'शिवी कोणा देऊ नये', 'पंत मेले-राव चढले', 'तेवढेच ज्ञानप्रकाशात' या त्यांच्या काही गाजलेल्या नाट्यछटा होत. दिवाकरांनंतर अन्य कोणी समर्थपणे हा प्रकार हाताळल्याचे दिसत नाही. कालीकदृष्ट्या छोटा प्रकार असल्याने स्पर्धांव्यतिरिक्त स्नेहसंमेलनाचा एक भाग म्हणूनच नाट्यछटा सादर होत आल्यात. काही अपवाद वगळता त्यांची स्वतंत्र सादरीकरणे झाली नाहीत, होत नाहीत. तरीदेखील आजपासून सुमारे शंभर वर्षांपूर्वी निर्माण झालेला हा नाट्यप्रकार कोणत्याही मराठी नाटकवाल्याला महत्त्वाचा वाटेल असाच आहे. अशा या व्यक्तिमत्वाचे १ ऑक्टोबर १९३१ रोजी निधन झाले. (साभार : प्रभात)

# श्रीवर्धनमध्ये तीन ठिकाणी जलवाहिनी फुटली

## लाखो लिटर पाणी वाया



**श्रीवर्धन : बातमीदार**

रानवली पाझर तलावापासून श्रीवर्धन शहरापर्यंत येणाऱ्या जलवाहिन्या अनेक वेळा फुटण्याचे प्रकार घडत आहेत, मात्र आज एकाच दिवशी तब्बल तीन ठिकाणी जलवाहिन्या फुटण्याचा प्रकार समोर आला आहे. श्रीवर्धन जसवली मार्गावरील ट्रॉली स्टॉप या शॉपिंग सेंटरच्या जवळ एका ठिकाणी जलवाहिनी फुटली आहे. तर दुसऱ्या ठिकाणी स्टार किड्स या शाळेसमोर व तिसरे ठिकाण जसवलीच्या पुढील ओमकार हॉटेलच्याजवळ.


श्रीवर्धन शहराला सुरळीत पाणीपुरवठा व्हावा व नागरिकांना शुद्ध पाणी मिळावे यासाठी जलशुद्धीकरण प्रकल्प उभारण्यात आला. जलशुद्धीकरण प्रकल्पापासून श्रीवर्धन येथील साठवण टाकीपर्यंत जुने झालेले पाईप बदलून नवीन जलवाहिन्या टाकण्यात आल्या, मात्र या नवीन केलेल्या कामामध्ये असंख्य त्रुटी असल्यामुळे तसेच काम निकृष्ट दर्जाचे झालेले असल्यामुळे जलवाहिन्या वारंवार फुटण्याचे प्रकार घडत आहेत. वारंवार जलवाहिन्या फुटत असल्यामुळे श्रीवर्धन शहरातील नागरिकांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा अनियमितपणे होत आहे.

सततच्या जलवाहिन्या फुटण्यामुळे लाखो लिटर पाणी वाया जात आहे. त्यामुळे यावर्षी भर उन्हाळ्यामध्ये श्रीवर्धन शहरामध्ये पाणीटंचाईची शक्यता नाकारता येत नाही. जलवाहिन्यांचे निकृष्ट काम व कामाचा सुमार दर्जा याबाबत राज्याच्या नगर विकास विभागाने चौकशी समिती नेमून श्रीवर्धन येथील कामाचे पूर्णपणे ऑडिट करावे, अशी मागणी शहरातील नागरिकांमधून करण्यात येत आहे.

# वृद्ध दाम्पत्याला धमकावून चोरी; माथेरानमध्ये घटना

**माथेरान, नेरळ : प्रतिनिधी**

माथेरानमधील वन ट्री हिल विभागातील स्थानिक रहिवाशी नारायण कदम यांच्या घरी चोरीची घटना घडली आहे. शुक्रवारी (दि.१६) रात्री नऊ ते साडेनऊ वाजण्याच्या सुमारास काही अज्ञात लोकांनी त्यांच्या घरात प्रवेश करून या वयोवृद्ध दाम्पत्याला धमकावून बांधून ठेवून घरातील मोल्यवान वस्तू व रोख रक्कम घेऊन पोबारा केला. माथेरानमध्ये अश्या प्रकारची चोरीची घटना पहिल्यांदाच घडली असल्याची चर्चा सर्वत्र सुरू आहे. या घटनेमुळे माथेरान शहरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून या चोरीच्या घटनेचा निषेध सगळी गावकरी मंडळी सोशल मीडियाच्या माध्यमातून व्यक्त करीत आहेत.



प्रसिद्ध पर्यटनस्थळ असलेल्या माथेरानमध्ये अश्या प्रकारच्या चोरीची घटना पहिल्यांदाच घडली असून या प्रकाराबाबत सर्वत्र भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. माथेरान मधील वन ट्री हिल पॉईंट शेजारी चहा, कॉफी, कोल्ड्रिंक्सचे दुकान आहे. हे दुकान माथेरान मधील स्थानिक रहिवाशी नारायण कदम यांचे असून ते आणि त्यांच्या पत्नी हे दुकान सांभाळतात. रात्री नऊ वाजता काही अज्ञात व्यक्ती काही हवं आहे अश्या बहाण्याने दुकानात शिरले आणि या दोघा दाम्पत्याना त्यांनी शस्त्राचा धाक दाखवून त्यांना बांधून ठेवले व घरातील रोख रक्कम आणि मौल्यवान वस्तू घेऊन पसार झाले. अचानक घडलेल्या घटनेमुळे कदम दाम्पत्याला मानसिक धक्का बसला असून सर्व परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

घटनेची माहिती स्थानिक पोलीस प्रशासनाला कळताच माथेरान पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अनिल सोनोने यांची टीम घटनास्थळी दाखल झाली असून पुढील तपास सुरू केला आहे, मात्र माथेरानच्या इतिहासात अशी घटना पहिल्यांदाच घडल्याने येथील सुरक्षाव्यवस्थतेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.जर या पर्यटनस्थळावरील स्थानिक व्यक्तीच सुरक्षित नसेल तर पर्यटकांच्या सुरक्षतेची जबाबदारी कोण घेणार, असेदेखील नागरिकांमधून बोलले जात आहे.

# जि.प., पं.स. निवडणुकीसाठी सार्वजनिक मालमत्ता विद्रुपीकरणास मनाई आदेश जारी

**रायगड : रामप्रहर वृत्त**

जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक-२०२६ चया पार्श्वभूमीवर निवडणूक काळात सार्वजनिक मालमत्तेचे विद्रुपीकरण रोखण्यासाठी जिल्ह्यात निर्बंध घालण्यात आले असल्याचा मनाई आदेश जिल्हादंडाधिकारी किशन जावळे यांनी जारी केला आहे.

## *शासकीय कार्यालयांच्या परिसरात सभा, मिरवणूक व प्रचारास बंदी*

***जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक-२०२६ च्या पार्श्वभूमीवर निवडणूक प्रक्रिया शांततेत, निर्भय व सुव्यवस्थितपणे पार पाडण्यासाठी जिल्ह्यात शासकीय कार्यालयांच्या परिसरात विविध उपक्रमांवर निर्बंध घालण्यात आले आहेत. याबाबत जिल्हादंडाधिकारी किशन जावळे यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३च्या कलम १६३ अन्वये आदेश निर्गमित केले आहेत. आदेशानुसार जिल्हाधिकारी कार्यालय, सर्व उपविभागीय अधिकारी कार्यालये, सर्व तहसील कार्यालये तसेच इतर सर्व शासकीय कार्यालयांच्या ठिकाणी निवडणूक कालावधीत कोणत्याही प्रकारची मिरवणूक, मोर्चा, आंदोलन, निदर्शने किंवा उपोषण करणे. घोषणा देणे, वाद्य वाजविणे किंवा गाणी म्हणणे.कोणत्याही प्रकारचा निवडणूक प्रचार करणे, या बाबींवर मनाई करण्यात आली आहे.***

मा.भारत निवडणूक आयोगाने १३ जानेवारी २०२६ रोजीच्या प्रसिध्दी पत्रकान्वये जिल्ह्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक-२०२६ चा कार्यक्रम जाहीर केला आहे. रायगड जिल्ह्यात गुरुवार, दि.५ फेब्रुवारीला मतदान तर शनिवार, दि.७ फेब्रुवारी २०२६ रोजी मतमोजणी होणार आहे. निवडणूक कालावधीत अनधिकृत होर्डिंग्ज, बॅनर्स, पोस्टर्स तसेच भिंतींवर जाहिराती लावून शासकीय व खासगी मालमत्तेचे विद्रुपीकरण होण्याची शक्यता लक्षात घेऊन हे आदेश जारी करण्यात आले आहेत.

राज्य निवडणूक आयोगाच्या स्पष्ट निर्देशानुसार जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच ग्रामीण भागात निवडणूक काळात कोणतेही होर्डिंग्ज, बॅनर्स, पोस्टर्स किंवा भिंतीवरील जाहिराती प्रदर्शित करण्यासाठी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक राहणार आहे. परवानगीचा कालावधी संपल्यानंतर संबंधित जाहिराती तात्काळ काढून इमारती व मालमत्ता पूर्ववत करण्याचेही आदेश देण्यात आले आहेत.

या पार्श्वभूमीवर जिल्हादंडाधिकारी यांनी आदर्श आचारसंहिता लागू असलेल्या कालावधीत निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत शासकीय, निमशासकीय तसेच सार्वजनिक मालमत्तेचे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष स्वरूपात कोणतेही विद्रुपीकरण करण्यास सक्त मनाई केली आहे.

प्रत्येक व्यक्तीपर्यंत हे आदेश स्वतंत्रपणे पोहोचविणे शक्य नसल्याने पोलीस विभागामार्फत ध्वनीक्षेपकाद्वारे आदेशांची जाहीर घोषणा व प्रसिध्दी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. आदेशांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही जिल्हा प्रशासनाने दिला आहे.

दरम्यान, जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक-२०२६ चया पार्श्वभूमीवर निवडणूक प्रक्रिया शांततेत पार पाडण्यासाठी तसेच निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत सार्वजनिक इमारतींच्या ठिकाणी व सार्वजनिक रस्त्यांवर निवडणूकसंबंधी पोस्टर्स, बॅनर्स, पॅम्प्लेट्स, कटआऊट्स, होर्डिंग्ज, कमानी लावणे या व इतर बाबींमुळे रहदारीस अडथळा निर्माण करण्यास (आचार संहितेच्या कालावधीमध्ये) निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत निर्बंध घालण्यात आले असल्याचा आदेश जिल्हादंडाधिकारी किशन जावळे यांनी जारी केला आहे.

# आचारसंहिता भंग केल्यास होणार कठोर कारवाई

**माणगाव : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक कार्यक्रमाची घोषणा झाल्याने संपूर्ण जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे.

निवडणूक प्रक्रिया शांततेत, कायदेशीर चौकटीत व सुव्यवस्थितपणे पार पाडण्यासाठी जिल्हाधिकारी, रायगड यांनी जमावबंदी आदेश लागू केले असून, त्या पार्श्वभूमीवर माणगाव पोलीस स्टेशनकडून नागरिक, मतदार व उमेदवारांसाठी महत्त्वपूर्ण सूचना जारी करण्यात आल्या आहेत. पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे, माणगाव पोलीस स्टेशन यांच्या वतीने देण्यात आलेल्या माहितीनुसार, निवडणूक काळात सर्व संबंधितांनी आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन करणे बंधनकारक आहे. कोणत्याही प्रकारचे बेकायदेशीर, भडकावू अथवा समाजात तणाव निर्माण करणारे वर्तन खपवून घेतले जाणार नाही. अशा प्रकारांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

विशेषतः सोशल मीडियाच्या वापराबाबत पोलीस प्रशासनाने स्पष्ट भूमिका मांडली आहे. व्हॉट्सअॅप, फेसबुक, इंस्टाग्राम, युट्युब आदी माध्यमांवर जात, धर्म, वंश, पंथ किंवा वर्गद्वेष निर्माण होईल अशी पोस्ट, संदेश, व्हिडिओ, रील किंवा स्टेटस टाकण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. तसेच मतदान प्रक्रियेचे जात - धर्माधारित ध्रुवीकरण करणारी कोणतीही सामग्री प्रसारित करू नये. चुकीची माहिती, अफवा वा दिशाभूल करणारी पोस्ट टाकणाऱ्यांवर आयटी कायदा, भारतीय दंड संहिता व निवडणूक कायद्यानुसार कारवाई केली जाईल, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. निवडणूक ही लोकशाहीचा उत्सव असून ती शांततेत पार पडणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे कोणत्याही प्रकारच्या मिरवणुका, निदर्शने, आंदोलने, उपोषणे करण्यास मनाई करण्यात आली आहे. नागरिकांनी कायदा व सुव्यवस्था राखण्यास प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस विभागाने केले आहे.

कोणताही गुन्हा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या घडू नये यासाठी निवडणूक नियमांचे पालन करणे अत्यावश्यक असल्याचे पोलीस प्रशासनाने नमूद केले आहे.

आचारसंहिता व कायद्याचे उल्लंघन केल्यास अटक, दंड व तुरुंगवासासह कठोर कायदेशीर परिणामांना सामोरे जावे लागेल, असा स्पष्ट इशारा देत, सर्व नागरिकांनी कोणत्याही दबावाला बळी न पडता निर्भयपणे मतदान प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहन माणगाव पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांनी केले आहे.

# रायगड जिल्ह्यात स्वच्छतेचा जागर

## सात हजार ९९८ किलो कचरा संकलन

**अलिबाग : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे करण्यासाठी रायगड जिल्हा परिषदेच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. याच अभियानाचा एक भाग म्हणून जिल्ह्यातील ग्रामपंचायती, शाळा, अंगणवाडी, प्राथमिक आरोग्य केंद्रे याठिकाणी शुक्रवारी (दि.१६) सामुहिक स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

या अभियानात अधिकारी, कर्मचाऱ्यांसह ग्रामस्थ, विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्त सहभाग घेतला. यावेळी सात हजार ९९८ किलो प्लास्टिक व सुका कचरा गोळा करण्यात आला. यामध्ये ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील प्लास्टिक व सुका कचरा गोळा करण्यात आला.

जमा कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील ग्रामपंचायती, शाळा, आरोग्य केंद्र, अंगणवाडी, उपकेंद्र असे मिळून एकूण २० हजार २८१ अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी, ग्रामस्थांनी हे स्वच्छता अभियान राबविले. यातून ७ हजार ९९८ किलो कचरा गोळा करण्यात आला असून त्याची योग्य ती विल्हेवाट लावण्यात आली आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे व स्वच्छता व पाणीपुरवठा विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी शुभांगी नाखले यांनी माणगाव तालुक्यातील वरचीवाडी व तळाशेत येथे स्वच्छता अभियानात सहभाग घेत ग्रामस्थांचा उत्साह वाढविला. श्रीवर्धन तालुक्यातील रानवली ग्रामपंचायत हद्दीतील जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर करून स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले.



# नैसर्गिक साधन संपत्तीविषयी कार्यशाळा




**महाड : रामप्रहर वृत्त**

प्राइड इंडिया महाड गेली अनेक वर्ष सातत्याने ग्रामीण विकास प्रकल्पांतर्गत शैक्षणिक, महिला विकास गट, वन समिती आणि इतर सामाजिक सांस्कृतिक कार्यक्रमाचे नियोजन सातत्याने करीत आली आहे. १३ ते १५ जानेवारी कालावधीत कोळसे, भेलोशी, नरवण अप्पर तुडील आदी गावांमध्ये महिला मंडळासाठी महिला सबलीकरण , हळदी कुंकू समारंभ तसेच लघुउद्योग म्हणजेच पेन बनवणे, पापड लोणचे तसेच इतर प्रक्रिया केलेले अन्नपदार्थ बनवणे या पद्धतीचे प्रात्यक्षिक मार्गदर्शन शिबिर घेण्यात आले.

तर ग्रामस्थांसाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये महाड येथील निसर्ग संवर्धन तसेच गिधाड संवर्धन प्रकल्प यशस्वी राबविणाऱ्या सिस्केप संस्थेतर्फे देवराई संवर्धन आणि औषधी वनस्पतींचे महत्त्व तसेच त्याविषयी दृकश्राव्य माध्यम आणि प्रात्यक्षिक उपक्रम याविषयी जनजागृती करण्यात आली. वन औषधी बेहडा, हिरडा, आवळा, कुडा, शेवगा, अडुळसा आधी अनेक गावांमध्ये उपलब्ध असलेल्या वनस्पतींविषयी आणि त्यांच्या औषधी गुणधर्मांविषयी प्रेमसागर मेस्त्री यांनी मार्गदर्शन केले.

ग्रामीण पर्यटन आणि वन्यजीवांचे महत्त्व तसेच शाश्वत विकास आदी संकल्पना त्यांनी स्पष्ट केल्या. या वेळी प्राइड इंडियाचे महाड शाखेतील समन्वयक सहाय्यक म्हणून वर्षा जामसुदकर आणि प्रतीक्षा यांनी काम पाहिले तर प्रकल्प अधिकारी श्री गोपाळ जाधव यांनी या उपक्रमाचे नियोजन केले. सिस्केप संस्था सदस्य महेश आणि श्रीकांत सुतार यांनी कार्यक्रम व्यवस्थापनाचे काम पाहिले.

# वृद्धाश्रमात संक्रांतीचा सण साजरा

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबागकर एक हात मदतीचा या ग्रुपतर्फे अलिबाग तालुक्यातील परहूर येथील श्री समर्थकृपा वृदधाश्रमात मकर संक्रांतीचा सण साजरा करण्यात आला. या वेळी वृदधाश्रमातील वृदधांना तिळगुळ आणि पुरणपोळीचे वितरण करण्यात आले.

या उपक्रमात सहभागी होण्यासाठी वेगवेगळ्या गावातून लोक मोठ्या संख्येने आले होते. यात तरूणांबरोबरच शाळकरी विद्यार्थ्यांचाही समावेश होता. त्यांनी तिथल्या वृदधांशी गप्पागोष्टी केल्या. यामुळे वृदधांच्या चेहरयांवरदेखील आपुलकीच्या भावना पहायला मिळाल्या. आम्हाला इथं रोजच सण असल्याची अनुभूती येते. अनेक दानशूर व्यक्ती या ठिकाणी येतात आणि आमच्या आनंदात सहभागी होतात. आमच्या घरच्यांसारखा संवाद साधतात त्यामुळे आम्हाला आमच्या घरच्यांची आठवण येत नसल्याचे इथल्या वृदध मंडळींनी सांगितले. आमच्या ग्रुपचे नाव सार्थक करण्याचा हा छोटासा प्रयत्न असून अधूनमधून आम्ही असे उपक्रम राबवत असतो, असे आयोजकांनी सांगितले.

अमरेश ठाकूर, मनोज माळी, पंकज पाटील, मिलिंद समेळ, अभिषेक कोळी, प्रथमेश घरात, अतुल गुरव, मयुरेश गावंड, संदीप वारगे, राजाराम हूलवाण, साक्षी राऊत, रोशन वर्तक, मिलिंद भालवणकर आदी या वेळी उपस्थित होते.




## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे पाली बुद्रुक, तहसील-पनवेल, जिल्हा- रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार, यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे:

**शेतजमीनीचे वर्णन**

**मौजे पाली बुद्रुक, तहसील पनवेल जिल्हा रायगड येथील जिल्हा परीषद रायगड, पंचायत समिती पनवेल, मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील**

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र: लावणी लायक हे.आर.प्रती | क्षेत्र: पोटखराबा हे.आर.प्रती | क्षेत्र: एकुण क्षेत्र हे.आर.प्रती | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|---|
| २२/३ | २ | १-४७-४० | ०-५१-१० | १-९८-५० | १८.८७ |

वरील शेतजमीन / मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन १५ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १७/०१/२०२६

**सही/-**
**अॅड. स्वप्निल व्यं. जाधव**
बी.ए., एल. एल. बी.
( खरेदीदाराचे वकील)

**कार्यालयीन पत्ता** - शॉप नं. १५४, पनवेल महानगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, दत्त झेरॉक्सच्यावर, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६.
मोबाईल : ८८८८२७१७५९


# समाजोपयोगी उपक्रमाने वाढदिवस साजरा

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्याच्या विठ्ठलवाडी परिसरात सामाजिक बांधिलकीचे प्रेरणादायी उदाहरण पाहायला मिळाले. राजमुद्रा फाऊंडेशनचे पदाधिकारी तसेच विठ्ठलवाडी गावचे युवक रितेश बारस्कर यांनी आपला वाढदिवस समाजोपयोगी उपक्रमाने साजरा केला.



राजमुद्रा फाऊंडेशनचे संस्थापक अमित घाग यांच्या पुढाकारातून नवजीवन शिक्षक प्रसारण मंडळ, खांब अंतर्गत येणाऱ्या विठ्ठलवाडी येथील राज खलाती व रजीप शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद व उत्साह दिसून आला.

या वेळी बोलताना पत्रकार जितेंद्र जाधव म्हणाले, ज्या गावात आपण राहिलो, वाढलो त्या गावाच्या मातीशी इमान राखून शिक्षण क्षेत्रासाठी काहीतरी करण्याची जिद्द अवघ्या १८व्या वर्षी बाळगणे हे निश्चितच कौतुकास्पद आहे. रितेश बारस्कर यांचा हा उपक्रम इतर माझी विद्यार्थ्यांसाठी आदर्श ठरेल.

त्यांनी शाळा, शिक्षक व ग्रामस्थांचे आभार मानत, राजमुद्रा फाऊंडेशनच्या माध्यमातून आगामी काळात प्राथमिक व माध्यमिक शाळांसाठी अधिक मदत करण्याचा प्रयत्न करू, असे आश्वासन दिले.

या कार्यक्रमास मानस अवसरे, पत्रकार जितेंद्र जाधव, रितेश बारस्कर, सार्थक भगत, ओम जंगम, सुनील जंगम, हायस्कूलचे मुख्याध्यापक गौतम जाधव, संदेश शिर्के सर, सुप्रिया जाधव, कस्तुरी जाधव, सचिन लोखंडे, मितेश पोटफोडे आदी उपस्थित होते.

# राष्ट्रीय सेवा योजनेतील शिबिरार्थी विद्यार्थ्यांनी काढली रस्ता सुरक्षेची रॅली

**कर्जत : प्रतिनिधी**

कोकण ज्ञानपीठ राहुल धारकर फार्मसी महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिर वेणगाव येथील श्री महालक्ष्मी मंदिराच्या परिसरात सुरू आहे. या शिबिरात पनवेल विभागीय मोटर परिवहन कार्यालयाच्या वतीने रस्ता सुरक्षेचे धडे देण्यात आले. शिबिरार्थी विद्यार्थ्यांनी जनजागृती रॅली काढली.

समर्थ मोटार ट्रेनिंग स्कूलच्या सहकार्याने रस्ता सुरक्षा जनजागृती महिन्याचे औचित्य साधून मोटर वाहन निरीक्षक जय शेट्ये, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक कल्याणी सुराटकर, यांनी राष्ट्रीय सेवा योजना शिबिराला भेट देऊन रस्ता सुरक्षेबाबत मार्गदर्शन केले. त्यानंतर शिबिरार्थींनी जनजागृती साठी रस्ता सुरक्षा रॅलीचे आयोजन केले होते.

विद्यार्थ्यांनी रस्ता सुरक्षा विषयक घोषणा दिल्या. या रॅलीला शेट्ये यांनी हिरवा झेंडा दाखविला. या वेळी उप प्राचार्य डॉ. अमोल चांदेकर, प्रा. अनिकेत इंदुलकर, प्रा. निलेश बोंडे आदी उपस्थित होते.





## जाहिर प्रसिध्दीकरण

पुढे नमूद केलेल्या सहकारी संस्थेचे सन २०२५ ते २०३० या कालावधीतील पंचवार्षीक निवडणूकीसाठी निवडणूक कार्यक्रम प्रसिध्द करण्यात येत आहे.

संस्थेचे नांव :- **साई प्रोव्हीसो सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. शिरढोण, ता. पनवेल जि. रायगड**

कार्यक्रमानुसार नामनिर्देशन पत्र स्वीकृती :- **दिनांक १९.०१.२०२६ ते २३.०१.२०२६**

नामनिर्देशनाची यादी प्रसिध्द करणे :- **दिनांक २३.०१.२०२६**

नामनिर्देशन पत्र छाननी दिनांक :- **दिनांक २७.०१.२०२६**

नामनिर्देशन पत्र माघारी दिनांक :- **दिनांक २९.०१.२०२६ ते १२.०२.२०२६**

व आवश्यकतेनुसार मतदान अनुक्रमे दिनांक २२.०२.२०२६ रोजी घेण्यात येईल. तपशीलवार निवडणूक कार्यक्रम, निवडणूकीबाबत सुचना व अधिक माहिती संस्थेच्या कार्यालयात व निवडणूक निर्णय अधिकारी तथा लेखापरीक्षक, सहकारी संस्था, पनवेल इंदिरा हरिहर बिल्डींग, तळमजला, लाईन आळी, न्यु म्हात्रे हॉस्पीटल शेजारी, पनवेल येथील कार्यालयात पहावयांस मिळेल तरी संस्थेच्या सभासदांनी याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**(मोहन ढेरंगे)**
**निवडणूक निर्णय अधिकारी, तथा लेखापरीक्षक सहकारी संस्था, पनवेल.**

# पनवेलमधील घरफोडीचा गुन्हा उघड

## आरोपीला अटक करून ७.२२ लाखांचा मुद्देमाल हस्तगत

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत टपालनाका परिसरात झालेल्या मोठ्या घरफोडीचा छडा लावण्यात पोलिसांना यश आले आहे. याप्रकरणी पोलिसांनी कुर्ला, मुंबई येथून एका सराईत गुन्हेगाराला अटक केली असून त्याच्याकडून चोरीला गेलेल्या सोन्याच्या दागिन्यांपैकी सात लाख २२ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.



फिर्यादी प्रमोद जोरी (रा. सचिन प्लाझा बिल्डिंग, पांजरपोळ, टपालनाका, पनवेल) यांच्या बंद घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी घरात प्रवेश केला होता. चोरट्यांनी घरातील ८,१२,००० रुपये किमतीचे सोन्याचे दागिने आणि ९०,००० रुपये रोख रक्कम, असा एकूण ९,०२,००० रुपयांचा मुद्देमाल लंपास केला होता.

याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली तपासासाठी पोलीस उपनिरीक्षक पी.एस.आय. विनोद लभडे, हवालदार अविनाश गंथडे, योगेश दिवेकर, परेश म्हात्रे, नाईक सम्राट डाकी,विनोद देशमुख, शिपाई किरण कराड आदींच्या पथकाने कमरुद्दिन सलाउद्दीन शेख (वय ४५ वर्षे, रा. टॅक्सीमन कॉलनी, कुर्ला, मुंबई) याला ताब्यात घेतले. तपास दरम्यान आरोपीकडून चोरीला गेलेल्या मालापैकी ७,२२,००० रुपये किमतीचे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले आहे.

# पनवेलमध्ये एसीपीएमकॉन २०२६ परिषद उत्साहात

**पनवेल : वार्ताहर**

पर्फ्युजनिस्ट परिवाराच्या वतीने आयोजित 'एसीपीएमकॉन २०२६' ही दोन दिवसीय परिषद पनवेल येथील विसावा रिसॉर्टमध्ये यशस्वीपणे झाली. या परिषदेने हृदय शस्त्रक्रिया प्रत्यारोपण पर्यंतची संजीवन प्रणाली, वैद्यकीय क्षेत्रातील नवीन संकल्पना, ज्ञानवर्धक सत्रे आणि मनोरंजनाचा अनोखा संगम सादर करून सर्व सहभागींच्या मनावर अमिट छाप सोडली.



परिषदेचे मुख्य आयोजक डॉ. विजय व्यवहारे, राजू दौड किरण आंब्रे, अभय चव्हाण, विराज शिगवण, शशी काळे, श्रीमती कुलकर्णी, विजया लांजे, प्रशांत धुमाळ,अक्षय रेवडेकर, प्राची सोनवणे, वैशाली मेटे, अनंतू नायर, प्रशांत धुरिया अभिलाष शेट्ये यांच्या नेतृत्वाखाली हा कार्यक्रम राबवण्यात आला. मार्गदर्शक म्हणून सुरेश काळे, डॉ. विश्वास पॉल, आनंद भोसले सर, संजय चौरे, पूर्णेंदु चौधरी, ह्यांनी जबाबदारी स्वीकारली. तर प्रामुख्याने सुधाकर किर्ते, उदय शेवटे, निशांत सिंह, विवेक पॉल, सुभाष सावंत, अमित पाटील, राजन, अर्पण जगताप , डॅनियल फर्नांडिस, अकमल खान , हुजैफा अन्सारी यश म्हस्के, संकेत धडसुळ, पंकज पाटील, ओंकार मते, उसामा शेख, अखिलेश मौर्य, अनंतु नायर, लहू सुपेकर, राहुल मल्हार, केईएम, डी. वाय. पाटील, भारती विद्यापीठ, जेजे हॉस्पिटल, नायर रुग्णालयातील विद्यार्थी आणि कंपनी प्रतिनिधी यांनी सक्रिय सहभाग घेतला.

परिषदेत वैज्ञानिक सत्रे, ईसीएमओ सिम्युलेशन, क्विझ स्पर्धा, पेपर प्रेझेंटेशन आणि ऑडिओ-व्हिडिओ सत्रांचा समावेश होता. तरुण पिढीच्या उत्साही सादरीकरणा मध्ये मधुरा तुपारे, नंदिनी खतापे, पंकज पाटील, ओंकार मते, हमीदुल्लाह अखमल, ऋतुजा पाटील आणी धनश्री जोशी ह्यांनी सर्वांना प्रभावित केले. मुख्य पाहुणे देशातील ज्येष्ठ शल्यचिकित्सक डॉ. जेम्स थॉमस यांनी पर्फ्युजनिस्ट परिवाराच्या प्रवासाचा आढावा घेतलेल्या छोट्या पण प्रभावी भाषणाने कार्यक्रमाला विशेष उंची दिली.

आयोजक अभय चव्हाण यांनी प्रभावी सूत्रसंचालक म्हणून जबाबदारी पार पाडली , तर डॉ. विजय व्यवहारे यांच्या मार्गदर्शनाने कार्यक्रमाचे नियोजन उत्तमपणे पार पडले. शारंग गुप्ता, प्रवीण राऊत, दीपेश शाह, अखिलेश चौधरी यांनी या परिषदेला 'अविश्वसनीय मूल्यवान' आणी 'उत्तम सांघिक कामगिरी 'म्हणून वर्णन केले. सर्व सादरकर्ते आणि आयोजकांच्या कष्ट, समर्पण आणि टीमवर्कसाठी सहभागींनी मनापासून धन्यवाद व्यक्त केले.

# पनवेल-कळंबोलीदरम्यान मध्य रेल्वेचा ब्लॉक

**पनवेल : वार्ताहर**

डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉरच्या (डीएफसीसी) पनवेल ते कळंबोलीदरम्यान ओपन वेब गर्डरची उभारणी करण्यात येणार आहे. यासाठी मध्य रेल्वेने १८ जानेवारी ते १५ फेब्रुवारीदरम्यान प्रत्येक आठवड्याच्या शनिवारी रात्री २ ते ५ तासांचा ब्लॉक घोषित केला आहे. तो पनवेल ते कळंबोलीदरम्यान अप आणि डाऊन मार्गावर असणार आहे. त्यामुळे १४ मेल/एक्सप्रेस वेळापत्रकांवर परिणाम होईल.

डीएफसीसी प्रकल्पातील ओपन चैब गर्डर ११० मीटर लांबीचा आहे. त्याचे वजन १५०० मेट्रिक टन असणार आहे. मध्यरात्रीच्या ब्लॉकमध्ये टप्प्याटप्प्याने गर्डर उभारणी पूर्ण करण्यात येणार आहे. ब्लॉक कालावधीत १६ मेल-एक्स्प्रेसवर परिणाम होणार असून काही मेल-एक्सप्रेस विलंबाने धावणार आहेत. लांब पल्ल्यांच्या रेल्वेगाड्यांनी प्रवास करताना संबंधित गाडीच्या वेळा पाहूनच प्रवासासाठी घराबाहेर पडावे, असे आवाहन मध्य रेल्वेने केले आहे.

# सीतातार्ई पाटील यांचा विजयी चौकार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खांदा कॉलनी येथील भाजपाच्या सीतातार्ई पाटील यांनी प्रभाग १५ ब मधून निवडणूक लढवताना चौथ्यांदा नगरसेवक पदी विजय मिळवला असून त्यांनी विजयाचा चौकार मारला आहे. पनवेल महानगरपालिकेच्या उपमहापौर पदाची जबाबदारी त्यांनी यापूर्वी सांभाळली होती.

खांदा कॉलनी आणि सीतातार्ई पाटील हे जणू समीकरणच बनले आहे. त्यामुळे त्यांनी विरोधकांना धूळ चारत चौथ्यांदा नगरसेवक पदाची माळ आपल्या गळ्यात घातली. तर भाजपचे एकनाथ गायकवाड यांनी विजयाची हॅट्रिक साधली आहे.



# नवनिर्वाचित भाजप नगरसेवकांचा सत्कार

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत सानपाडा प्रभाग क्रमांक १९ चे भाजपचे निवडून आलेले नवनिर्वाचित नगरसेवक भाऊ भापकर आणि सुनिल कुरकुटे विजयी झाल्याबद्दल त्यांचा मिलेनियम टॉवर बी टाईप हाऊसिंग सोसायटीच्या वतीने पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला.



निवडून आलेल्या निवडून आलेल्या नगरसेवकांनी सानपाडावासियांसाठी उत्तम कार्य करून सानपाडा विभागाला नवी मुंबईत आकर्षित बनवावे. नवी मुंबईत इतर भागांनी सानपाड्याचा आदर्श घ्यावा असे रहिवाशांनी मत मांडले. यावर नगरसेवकांनी २४ तास सानपाडा वासियांसाठी आम्ही सेवेत राहू जमिनीवर पाय ठेवून काम करू असे आश्वासन दिले.

या वेळी राजू सैद, अशोक कवडे, श्रीमती आहेर, शिवाजी पाटणे, सिद्धार्थ रायगावकर, बलजीतसिंग अरोरा, मारुती विश्वासराव, सुनिल नाईक, चंद्रकांत सरनोबत, रामचंद्र पाटील, निवृत्ती ढोबळे, प्रभाकर भेरे, मनोज भुमकर, सतीश गायकवाड, विष्णू परब, भरत खरात, बाळू शेळके आदी उपस्थित होते.



**पनवेल : मनपा प्रभाग क्रमांक १७मध्ये भाजप महायुतीचे उमेदवार ॲड. प्रकाश बिनेदार, डॉ. अस्मिता घरत, ॲड. शिवानी घरत, ॲड. मनोज भुजबळ हे चारही उमेदवार निवडून आले आहेत. त्यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे दर्शन घेतले. सोबत भाजप अनुसूचित जाती मोर्चा पनवेल शहरध्यक्ष रावसाहेब खरात व मोठ्या प्रमाणात पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**

# नवीन शेवा येथून प्रतिशिर्डीपर्यंत साई दिंडी

**उरण : वार्ताहर**

सालाबाद प्रमाणे यावर्षी देखील स्व.शालिनी घरत यांनी चालू केलेली दिंडी श्री साई शक्ती मंडळ उरण विभाग यांच्या वतीने श्री साई बाबा पालखी दिंडी महिला व पुरुषा सह पदयात्रा गुरुवार, १५ जानेवारी २०२६ रोजी श्री राम मंदिर नवीन शेवे येथून सकाळी ६ वाजता साई बाबाची आरती करून यात्रा पद प्रतिशीर्डी कडे प्रस्थान झाले. ही पालखी दिंडी रविवार दिनांक १८ जानेवारी २०२६ रोजी दुपारी मध्यान्ह आरती करता पोहचणार आहे.

ही पायी पालखी शेवे गावातून निघाल्यावर जागो जागी पालखी चे दर्शन घेऊन जोरात स्वागत करण्यात आले. पायी पालखी दिंडी जासई येथे आल्यावर पायी पालखीचे जासई येथील मनोहर पाटील यांच्या कुटुंबियांच्या वतीने पालखी दिंडीचे जोरात स्वागत करून कुटुंबियांनी दर्शन घेतले. या वेळी पदयात्री ना चहा व नाष्टा देण्यात आला. त्यानंतर पायी पालखी दिंडी मध्यान्ह आरती करिता बंबावी पाडा पोचली. येथे पायी पालखीचे सागर मढवी यांच्या कुटुंबियांनी स्वागत करून पदयात्री ना भोजन देण्यात आले.त्यानंतर विश्रांती नंतर रात्री मुक्काम साठी अजीवली येथे यशोदीप वजन काटा येथे पोचली. येथे ह.भ.प. श्री परशुराम माळी यांच्या कुटुंबियां कडून यथोचित स्वागत झाले.



पायी पालखी दिंडी यशस्वी करण्यासाठी संचालक रूपेश घरत, कार्याध्यक्ष हरेश घरत, उपाध्यक्ष हरेश्वर ठाकूर, मनीषा घरत, मार्गदर्शक व खजिनदार रामचंद्र घरत, सहखजिनदार मिलिंद तांडेल, जगदीश भोईर, सेक्रेटरी मनोहर तांडेल, शकुंतला ठाकूर, नितीन घरत, सुनिल पाटील, सुनिल घरत, रामदास घरत आदी सह सदस्य मेहनत घेत आहेत.

## सैनिकांचा कृतज्ञता सन्मान सोहळा आणि संगीतमय मानवंदना

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलने देशासाठी शहीद झालेल्या सैनिकांच्या माता, पत्नी आणि निवृत्त सैनिक यांचा कृतज्ञता सन्मान सोहळा आणि त्यांना संगीतमय मानवंदना असा कार्यक्रम २० जानेवारी रोजी आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे दुपारी साडेचार वाजता आयोजित केला आहे.

या कार्यक्रमात भारत पाकिस्तान युद्ध, कारगिल युद्ध, ऑपरेशन सिंदूर, विविध युद्ध प्रसंग यावर आधारित एवी क्लिप दाखवण्यात येणार आहेत. त्यावेळी मार्गदर्शक म्हणून डॉक्टर गिरीश गुणे, प्रेसिडेंट अनिल ठकेकर, प्रोजेक्ट चेअरमन प्रकाश रानडे, सेक्रेटरी आतिश थोरात उपस्थित राहणार असून त्या ठिकाणी विनामूल्य प्रवेश आहे.

अहोरात्र डोळ्यात तेल घालून आपल्या भारत मातेचे रक्षण करणारे सैनिक, जाज्वल्य देशभक्तीची भावना नागरिकांमध्ये जागवणाऱ्या आणि वीर पत्नी, वीर माता व निवृत्त सैनिक यांच्या प्रति आदर आणि कृतज्ञता व्यक्त करणाऱ्या कार्यक्रमाला देशभक्त पनवेलकरांनी उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# अबोली महिला रिक्षा संघटनेने मतदारांना दिली मोफत सेवा

**पनवेल : वार्ताहर**

नुकतेच पार पडलेल्या पनवेल महानगरपालिकेच्या निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढावा यासाठी निवडणूक आयोगाकडून विविध उपाययोजना राबवण्यात आल्या. याच पार्श्वभूमीवर सामाजिक बांधिलकी जपत अबोली महिला रिक्षा संघटनेतर्फे एक स्तुत्य उपक्रम राबवण्यात आला.

अबोली महिला रिक्षा संघटनेचे अध्यक्ष संतोष भगत यांच्या पुढाकाराने प्रभाग क्रमांक १२ मध्ये मतदारांना त्यांच्या घरापासून मतदान केंद्रापर्यंत व मतदानानंतर पुन्हा घरी सोडण्याची मोफत रिक्षा सेवा उपलब्ध करून देण्यात आली. या उपक्रमामुळे ज्येष्ठ नागरिक, महिला तसेच दिव्यांग मतदारांना मतदान केंद्रापर्यंत पोहोचण्यासाठी मोठा दिलासा मिळाला.



या सेवेमुळे अनेक मतदारांनी उत्स्फूर्तपणे मतदानात सहभाग घेतला असून लोकशाही प्रक्रियेला बळ मिळाले आहे. मतदान हा प्रत्येक नागरिकाचा हक्क आणि कर्तव्य आहे. कोणत्याही अडचणीमुळे कोणीही मतदानापासून वंचित राहू नये, अशी भूमिका अध्यक्ष संतोष भगत यांनी व्यक्त केली.

अबोली महिला रिक्षा संघटनेने लोकशाही बळकट करण्यासाठी उचललेली ही खारीचा वाट सर्वत्र कौतुकास्पद ठरत आहे. सामाजिक जाणीव ठेवून राबवलेल्या या उपक्रमाबद्दल नागरिक, स्थानिक कार्यकर्ते आणि विविध स्तरांतून अध्यक्ष संतोष भगत व त्यांच्या संघटनेचे अभिनंदन केले जात आहे.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात क्लाऊड कम्प्युटिंगसंदर्भात मार्गदर्शन सत्र

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शनिवारी (दि.१७)सेंटर फॉर करिअर गायडन्स ट्रेनिंग व प्लेसमेंट समिती, माहिती तंत्रज्ञान, कम्प्युटर सायन्स विभाग व अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने क्लाऊड कम्प्युटिंग या विषयावर विशेष मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते.





या शैक्षणिक सत्रासाठी माहिती तंत्रज्ञान व संगणकशास्त्र विभागातील एकूण ५५ विद्यार्थी उपस्थित होते. सदर सत्रासाठी अजस मन्सुरी हे विषयतज्ज्ञ म्हणून लाभले तसेच त्यांनी क्लाऊड कम्प्युटिंग या आधुनिक आणि वेगाने विकसित होत असलेल्या तंत्रज्ञानाबाबत विद्यार्थ्यांना सखोल व उपयुक्त मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना क्लाऊड कम्प्युटिंगच्या मूलभूत संकल्पना, त्याची रचना (आर्किटेक्चर), तसेच प्रत्यक्ष उद्योगक्षेत्रात त्याचा होणारा उपयोग याविषयी माहिती देणे हा होता. सत्रादरम्यान क्लाऊड कम्प्युटिंगमधील विविध सेवा, जसे की इन्फ्रास्ट्रक्चर ॲज अ सर्व्हिस, प्लॅटफॉर्म ॲज अ सर्व्हिस आणि सॉफ्टवेअर ॲज अ सर्व्हिस यांचे सविस्तर स्पष्टीकरण देण्यात आले. तसेच भविष्यातील नोकरीच्या संधी, आवश्यक कौशल्ये आणि तांत्रिक तयारी याबाबत मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी प्रश्नोत्तराच्या माध्यमातून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले.

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे व प्रा. प्रथमेश उदेकर, समन्वयक, अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष यांच्या मार्गदर्शनात हा शैक्षणिक उपक्रम घेण्यात आला. या उपक्रमाचे आयोजन प्रा. रिजवाना मोमीन, प्रा. राजश्री म्हात्रे व प्रा. अर्पिता नायक यांनी आयोजन केले तसेच दोन्ही विभागातील व सेंटर फॉर करिअर गायडन्स व प्लेसमेंट सेल समितीतील इतर सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले. अशा प्रकारच्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचे तांत्रिक ज्ञान वाढून ते उद्योगजगतातील आव्हानांना सामोरे जाण्यास सक्षम होतील, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

# सानपाडा येथे मराठा समाजाचा वधू-वर मेळावा

**नवी मुंबई : बातमीदार**

सानपाडा येथे मराठा विकास प्रतिष्ठानच्या वतीने १० जानेवारी २०२६ रोजी केमिस्ट भवन येथे १६ वा मराठा समाजाचा वधु- वर परिचय मेळावा झाला. मराठा विकास प्रतिष्ठान ही संस्था २००६ पासून सांस्कृतिक, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात गेली २० वर्षे सातत्याने कार्यरत आहे.

सध्याच्या काळात समाजामध्ये विवाहासाठी योग्य वधू-वर जुळवणे ही एक गंभीर सामाजिक समस्या निर्माण झाली असून, घटस्फोटाचे प्रमाण वाढत चालले आहे त्याचप्रमाणे विवाह नोंदणीत मुलांची संख्या जास्त असून मुलींची संख्या कमी होत चालली आहे.



या उपक्रमाच्या माध्यमातून आतापर्यंत अनेक विवाह जुळविण्यात संस्थेला यश आले आहे. अशा प्रकारे नवी मुंबई केमिस्ट असोसिएशनचे सचिव सुनीलशेठ छाजेड, नगरसेवक सोमनाथ वासकर, समाजसेवक भाऊ भापकर, तानाजी पाटील, डॉ. मंगेश आमले, किशोर दांगट, डिंपल ठाकूर, भावेश पाटील, डॉ. विद्या खंबाळकर, ज्येष्ठ नागरिक संघाचे माजी अध्यक्ष मारुती कदम आदी मान्यवरांनी वधूवर व पालकांना शुभेच्छा दिल्या. स्वागतपर भाषण मंडळाचे सहसचिव व ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष मारुती विश्वासराव यांनी केले. प्रास्ताविक भाषण संघाचे अध्यक्ष जालिंदर भोर यांनी केले तर संघाच्या आर्थिक अहवालावर संघाचे खजिनदार विष्णुदास मुखेकर यांनी मार्गदर्शन केले. मंडळाच्या कार्याचा आढावा संघाचे सचिव किरण नलावडे यांनी घेतला.

या विवाह सोहळ्याचे सुंदर निवेदन समाजसेवक अरुण रोडे यांनी केले. मंडळाच्या सहसचिव ज्ञानेश्वर जाधव यांनी आभार मानले. या वेळी समाजसेवक आबा जगताप, कोमल वासकर, नेहा वासकर, अजय पवार, बाबाजी इंदोरे, सानपाडा ज्येष्ठ नागरिक संघाचे सचिव जगदीश एकावडे, खजिनदार महादेव पाटील, संघाचे माजी उपाध्यक्ष विठ्ठल गव्हाणे, सहखजिनदार सुभाष बारवाल, जुन्नर आंबेगाव मुलुंड मंडळाचे प्रतिनिधी भालेराव, समाजसेवक विसाजी लोके, शामराव मोरे, भाऊसाहेब आहेर, मारुती शिंगोटे, विष्णू कोरडे, धंद्रे आदी मान्यवर उपस्थित होते.

मेळावा यशस्वी करण्यासाठी मराठा विकास प्रतिष्ठानचे पदाधिकारी शिवाजी पाटील, कृष्णा ऊतेकर, कांताराम जाधव, देवराम भोर, पांडुरंग वाजे, उरसळ, बोराडे, कर्मचारी दिपाली पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले. या मेळाव्यात ४०० वधू - वर व पालक उपस्थित होते.

# जिल्हा रुग्णालयात रजोनिवृत्ती क्लिनिकचा शुभारंभ

## सार्वजनिक आरोग्य विभागाचे महिलांना मकरसंक्रांतीचे आरोग्यदायी वाण

**रायगड : रामप्रहर वृत्त**

वयाची चाळीशी ओलांडल्यानंतर महिलांच्या शरीरात होणारे हार्मोनल बदल आणि रजोनिवृत्तीच्या काळात उद्भवणाऱ्या विविध शारीरिक व मानसिक समस्यांवर योग्य मार्गदर्शन मिळावे, या उद्देशाने जिल्हा रुग्णालयात 'रजोनिवृत्ती क्लिनिक'चा शुभारंभ करण्यात आला. शासनाच्या माध्यमातून सुरू करण्यात आलेले हे क्लिनिक जिल्ह्यातील ४० ते ५५ वयोगटातील महिलांसाठी मकर संक्रांतीचे एक अनोखे आरोग्यदायी वाण ठरले आहे.



या विशेष उपक्रमाचे आयोजन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निशिकांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. शीतल जोशी यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

रजोनिवृत्ती हा महिलांच्या आयुष्यातील एक अत्यंत संवेदनशील टप्पा असून या काळात अनेक स्त्रिया अनेक समस्यांशी लढा देत असतात. हे लक्षात घेऊन या क्लिनिकच्या माध्यमातून महिलांना सर्वसमावेशक आरोग्य सेवा पुरवली जाणार आहे.

या वेळी मार्गदर्शन करताना स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. भोपाळे यांनी रजोनिवृत्ती दरम्यान शरीरात होणाऱ्या बदलांची सविस्तर माहिती दिली. त्यांनी सांगितले की, पाळी थांबण्याच्या प्रक्रियेत शरीरातील हार्मोन्सची पातळी कमी-जास्त होते, ज्यामुळे हाडांचा ठिसूळपणा वाढतो व थोडीशी पडझड झाल्यास देखील हाड मोडू शकते. तसेच उष्णता जाणवते आणि थकवा यांसारखे त्रास उद्भवतात. योग्य वैद्यकीय सल्ला आणि जीवनशैलीत बदल केल्यास हे त्रास सहज दूर होऊ शकतात, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

रजोनिवृत्तीचा परिणाम केवळ शारीरिक स्वास्थ्यावरच नाही, तर मानसिक आरोग्यावरही होतो. याबाबत अधिक माहिती देताना मानसोपचार तज्ज्ञ डॉ. अर्चना सिंग म्हणाल्या की, हार्मोनल बदलांमुळे या वयोगटातील महिलांमध्ये चिडचिड होणे, अचानक नैराश्य येणे किंवा झोप न लागणे अशा समस्या दिसून येतात. अशा वेळी कुटुंबाचा आधार आणि तज्ज्ञांचे समुपदेशन महिलांना या स्थितीतून बाहेर पडण्यास मदत करते.

अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. शितल जोशी यांनी या नवीन सुविधेबाबत अधिक माहिती दिली. जिल्हा रुग्णालयातील हे रजोनिवृत्ती क्लिनिक दर बुधवारी महिलांच्या सेवेसाठी उपलब्ध असेल. या वयोगटातील महिलांची मोफत तपासणी, औषधोपचार आणि समुपदेशन या दिवशी केले जाईल, असे त्यांनी जाहीर केले. जास्तीत जास्त महिलांनी या मोफत सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी या वेळी केले.

या उद्घाटन कार्यक्रमाला मेट्रन गायत्री म्हात्रे, असिस्टंट मेट्रन अनिता भोपी, विविध विभागांच्या परिसेविका, रुग्णालयातील कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रतिम सुतार यांनी केले. जिल्हा रुग्णालयाच्या या स्तुत्य उपक्रमामुळे महिला वर्गातून समाधान व्यक्त होत असून, स्त्रियांच्या आरोग्याकडे पाहण्याचा एक नवा दृष्टिकोन या निमित्ताने समोर आला आहे.

## मतदानाच्या दिवशी आठवडा बाजारांना पूर्णवेळ बंदी

**रायगड : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूकच्या पार्श्वभूमीवर मतदान प्रक्रिया सुरळीत व निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्ह्यात मतदानाच्या दिवशी आठवडा बाजारांना पूर्णवेळ बंदी घालण्यात आली असल्याचे आदेश जिल्हादंडाधिकारी किशन जावळे यांनी निर्गमित केले आहेत.

भारत निवडणूक आयोगाने १३ जानेवारीच्या प्रसिध्दी पत्रकान्वये जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. रायगड जिल्ह्यात गुरुवार, ५ फेब्रुवारीला मतदान, तर शनिवार, ७ फेब्रुवारी रोजी मतमोजणी होणार आहे. मतदानाच्या दिवशी मतदारांना कोणतीही अडचण न येता आपला मतदानाचा हक्क बजावता यावा तसेच मतदान प्रक्रिया शांततेत व सुरळीत पार पडावी, या उद्देशाने हे आदेश जारी करण्यात आले आहेत.

जिल्हादंडाधिकारी यांनी बाजार व जत्रा अधिनियम, १८६२ चे कलम ५ (ग) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करत गुरुवार, ५ फेब्रुवारी रोजी पोलीस अधीक्षक रायगड यांच्या कार्यक्षेत्रातील जिल्हा परिषद व पंचायत समिती मतदार संघांमध्ये ज्या ठिकाणी आठवडा बाजार भरतो, अशा सर्व ठिकाणी आठवडा बाजार पूर्णवेळ बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

या आदेशामुळे मतदान केंद्रांच्या परिसरात गर्दी टाळणे, वाहतुकीचा अडथळा कमी करणे आणि मतदारांना मतदानासाठी मोकळे व सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देणे शक्य होणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही जिल्हा प्रशासनाने दिला आहे.

## लोणेरे तंत्रशास्त्र विद्यापीठात जेन झी थॉट्स उपक्रम



**माणगाव : प्रतिनिधी**

लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ आणि अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या वतीने झेन जी थॉट्स या अभिनव उपक्रमाचे तसेच थॉट वॉलचे उद्घाटन कुलसचिव प्रा. डॉ. अमित शेष यांच्या हस्ते करण्यात आले.

उद्घाटन सोहळ्याला विद्यापीठाचे डीन प्रा. डॉ. संजय नलबलवार, इनकुबेशन केंद्राचे सीईओ उमेश काकडे, प्रा. सूरज शेलार, प्रा. डॉ. नीरज कुलकर्णी, प्रा. साळुंखे, प्रा. कुरेशी आणि प्रा. सिद्धार्थ घोंगडे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची मांडणी अभाविप विद्यापीठ अध्यक्ष रोहन मदने यांनी केलीम तर झेन जी थॉट्स या उपक्रमाची भूमिका, उद्दिष्टे व सविस्तर माहिती कुंदन चव्हाण यांनी उपस्थितांसमोर मांडली. हा उपक्रम १४ ते २३ जानेवारीदरम्यान राबविण्यात येणार असून यामध्ये चालता-बोलता, पॉडकास्ट तसेच विविध सामाजिक, शैक्षणिक, उद्योजकता विकास, स्वावलंबी भारत, महिला सशक्तीकरण, विकसित भारत, महाराष्ट्रातील विद्यापीठांच्या खुल्या निवडणुका आदी विषयांवरील चर्चासत्रांचे आयोजन करण्यात येणार आहे.

या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आपले विचार, मते व दृष्टिकोन मुक्तपणे व्यक्त करण्यासाठी एक सशक्त व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले आहे. विद्यापीठातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभागी होऊन आपले विचार मांडावेत, असे आवाहन अभाविप अध्यक्ष रोहन मदने यांनी केले आहे.

## ज्येष्ठांच्या मागण्यांची पूर्तता करू -कुलदीपक शेंडे

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोलीतील ज्येष्ठ नागरिकांच्या ज्या ज्या अडचणी असतील त्या सोडवण्यासाठी मी व सर्व नगरसेवक प्रयत्नशील असू. ज्येष्ठांसाठी नाना नानी पार्कदेखील नजीकच्या काळात बनविण्यासाठी आम्ही सर्व जण प्रयत्नशील राहू, अशी ग्वाही नवनिर्वाचित नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे यांनी दिली. ते खोपोली ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने आयोजित नवनिर्वाचित नगराध्यक्ष, नगरसेवकांच्या सत्कार समारंभात बोलत होते.



### खोपोली ज्येष्ठ नागरिक संघातर्फे नवनिर्वाचित नगराध्यक्षांसह नगरसेवकांचा सत्कार

व्यासपीठावर उपनगराध्यक्ष विक्रम साबळे, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष रवींद्र घोडके, जिल्हा समन्वय समिती अध्यक्ष सुरेश पालकर, उपाध्यक्ष वर्षा जोगळेकर, सेक्रेटरी नरेंद्र हर्डीकर यांच्यासह नगरसेवक-नगरसेविका उपस्थित होते.

अध्यक्ष रवींद्र घोडके यांचे हस्ते नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे व उपनगराध्यक्ष विक्रम साबळे यांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. जिल्हा समन्वय समिती अध्यक्ष सुरेश पालकर यांना पुणे येथे अंजनी फाउंडेशनच्या वतीने राष्ट्रीय स्तरावरील जीवन गौरव पुरस्कार प्राप्त झाला त्यानिमित्त नगराध्यक्ष शेंडे व उपनगराध्यक्ष साबळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यानंतर ज्येष्ठ नागरिक संघाच्या सदस्यांच्या हस्ते उपस्थित नगरसेवक व नगरसेविका यांचा सत्कार करण्यात आला.

प्रमुख मान्यवरांच्या हस्ते श्री गणेश व छत्रपती शिवरायांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. ज्येष्ठ सदस्य वासुदेव पाटील यांनी स्वागत गीत सादर केले. उपनगराध्यक्ष विक्रम साबळे यांनीही मनोगत व्यक्त केले. प्रमुख पाहुणे सुरेश पालकर यांनी आपल्या मनोगतात ज्येष्ठांसाठीच्या योजना, त्यातील त्रुटी तसेच शासनाकडे दिलेल्या निवेदनांचा पाठपुरावा करण्यावर भर दिला तसेच नगराध्यक्षांच्या हस्ते जाहीर सत्कार केल्याबद्दल ज्येष्ठ नागरिक संघास धन्यवाद दिले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. पाठक यांनी केले. आभार सेक्रेटरी नरेंद्र हर्डीकर यांनी मानले. माजी उपाध्यक्ष सुप्रिया मेहेंदळे यांनी पसायदान सादर केले. शेवटी राष्ट्रगीताने समारंभाची सांगता झाली.

सत्कार समारंभासाठी ज्येष्ठ नागरिक संघाचे माजी अध्यक्ष एल.बी. पाटील, एन.डी. चौधरी, ज्येष्ठ सदस्य रामविलास जाखोटिया व बंधू भगिनी उपस्थित होते.

## खोपोली नगरपालिकेत अपक्ष नगरसेवकाचा महायुतीला पाठिंबा

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली नगरपालिकेत नुकत्याच निवडून आलेल्या प्रभाग क्रमांक पाचचे अपक्ष उमेदवार राहुल यशवंत गायकवाड यांनी महायुतीत शिवसेनेला पाठिंबा देत असल्याचे घोषित केले आहे.



राहुल गायकवाड हे पहिल्यापासूनच शिवसेनेचे समर्थक होते, परंतु महायुतीत तिकीट वाटपात प्रभाग क्रमांक पाचची उमेदवारी भाजपच्या वाट्याला आल्यानंतर त्यांनी अपक्ष अर्ज दाखल केला व ते निवडून आले. खोपोली शहराच्या विकासासाठी आपण महायुतीला पाठिंबा देत असल्याचे गायकवाड यांनी प्रसारमाध्यमांना सांगितले.

खोपोली नगरपालिकेत महायुतीची सदस्य संख्या शिवसेनेचे १४, भाजपचे चार अशी १८ होती. त्यात अपक्ष राहुल गायकवाड व राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या सुवर्ण मोरे यांनीही महायुतीला पाठिंबा दिल्याने आता ही सदस्य संख्या २० झाली आहे.

## विरजोली शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात

**रोहा : प्रतिनिधी**

रा.जि.प केंद्रीय प्राथमिक शाळा विरजोली येथे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साही वातावरणात साजरे करण्यात आले. स्नेहसंमेलनानिमित्त विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम सादर झाला. यामध्ये इ.१ ली ते इ.७ वी.पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.



या वेळी गाणी, नृत्य, एकांकीका, समाजप्रबोधनपर अनेक विषय घेवून विविध सांस्कृतीक सादरीकरणानी रंगत आणली. सांस्कृतिक विविधतेचे दर्शन घडून आले. या शाळेने ९९व्या वर्षात पदार्पण केले आहे. शाळेने ते व्यासपीठावर आकर्षक रोषणाई करून अधोरेखित केले होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून विद्येच्या देवता सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या वेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळा-व्यवस्थापन समीतीचे सभापती राजू कांबळे, उद्घाटक संदीप चोरगे, सुनील चोरगे, निर्मला राजमलजी कांकरिया, रोहित कांकरिया, प्रतीक्षा मोरे, प्रदीप कुंडे, उमेश घोंगडे, नामदेव पानसरे, प्रकाश धुमाळ, संजय नाकती, संजना नाकती, संदीप जामकर, राजेंद्र कुडे, जगदीश कांबळे, अमोल चव्हाण, संदेश पालांडे, नारायण पानसरे, शुभांगी नागे, राजू धुमाळ, सुरज नाकती, मनोज कांबळे, अमिता बैकर, निशा कुंडे, अमिता धुमाळ, मोनिका नाकती, संदीप वाघमारे, मुक्ता भगत आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संगम बेजगमवार यांनी व सूत्रसंचालन शिवकुमार माने यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षकवर्ग माने, संगम, मेघा खराडे, अर्चना बनसोडे, संतोष जाधव, वैशाली घरटकर, पल्लवी धुमाळ व कर्मचारीवृंदाने परिश्रम घेतले.

## मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर ब्रेक फेल ट्रेलरचा अपघात

**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर रात्री एका भरधाव वेगातील ट्रेलरचा ब्रेक न लागल्याने त्याने समोरील कठड्याला जोरदार धडक दिली. या अपघातात ट्रक चालक केबिनमध्ये अडकून गंभीर जखमी झाला.

एक्सप्रेस वेवरून रात्री एक ट्रेलर (एमएच ०४ केएफ २०९२) चालक इम्तियाज अली (रा. प्रतापगड, उत्तर प्रदेश ) पुण्याहून मुंबईकडे घेऊन जात असताना बोरघाटात अमृतांजन ब्रिजजवळ आला असता ब्रेक फेल झाल्याने त्याने समोरील कठड्याला जोरदार धडक दिली. या अपघातात ट्रेलरचे पूर्णपणे नुकसान होऊन चालक केबिनमध्ये अडकून गंभीर जखमी झाला आहे.




चालक गंभीर जखमी

## पाच्छापूरमध्ये विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा जागर

**पाली : प्रतिनिधी**

श्री सोमजाई शिक्षण प्रसारक मंडळाच्या माध्यमिक विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या अंगभूत कलागुणांना वाव देणाऱ्या या सोहळ्याने उपस्थितांची मने जिंकली.



कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने करण्यात आली. शाळेचे मुख्याध्यापक दीपक माळी यांनी सोहळ्याचे प्रास्ताविक व मान्यवरांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन दिव्या जंगम यांनी केले. स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी विविध गुणदर्शन कार्यक्रमांचे सादरीकरण केले. यामध्ये प्रामुख्याने नृत्य आणि नाटिका, ऐतिहासिक घटनांवर आधारित नाटके आणि शेतकरी नृत्य, लोककला, लावणी आणि वारकरी नृत्य, सामाजिक संदेश देणारी स्त्री शिक्षणावर आधारित गीते आणि प्रबोधनपर गीते व समूह गान आदींचा समावेश होता. विद्यार्थ्यांच्या या दर्जेदार सादरीकरणामुळे संपूर्ण सभागृह टाळ्यांच्या कडकडाटाने दुमदुमून गेले होते.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे सुधागड तालुका अध्यक्ष संदेश शेवाळे यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक केले. शिक्षण घेत असतानाच अशा सांस्कृतिक उपक्रमांमुळे व्यक्तिमत्व विकास होतो, असे मत त्यांनी मांडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत घोसाळकर होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात संस्थेच्या शैक्षणिक वाटचालीचा आढावा घेतला आणि भविष्यातील ध्येये स्पष्ट केली.

स्नेहसंमेलनास संस्थेचे सचिव पांडुरंग दिघे, खजिनदार एकनाथ ओंबळे, संचालक एकनाथ चांदे, धर्मा बेलोसे, विद्या तांबट, ग्रामपंचायत सरपंच उत्कर्षा बेलोसे, सदस्य उमेश तांबट, व्यापारी भद्रेश शहा, माजी कर्मचारी अरुण घोसाळकर उपस्थित होते तसेच शिक्षक सूचीर खाडे, सारिका गायकवाड, नारायण वारा, कर्मचारी प्रल्हाद ओंबळे, संदीप डिंगळे यांच्यासह प्रतिष्ठित ग्रामस्थ, माजी विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने हजर होते. दिव्या जंगम यांनी उपस्थितांचे आभार मानले आणि राष्ट्रगीताने सोहळ्याची सांगता झाली.

## तटकरे कॉलेजचे एनएसएस शिबिर

**रोहा : प्रतिनिधी**

एम.बी. मोरे फाऊंडेशनचे सौ. वरदा सुनील तटकरे कला, वाणिज्य आणि विज्ञान महिला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विभागाच्या सात दिवसीय निवासी शिबाराचे उद्घाटन रा.जि.प शाळा, किल्ला येथे करण्यात आले. हे शिबिर १५ व २१ जानेपर्यंत चालणार आहे.

या वेळी नमिता बामुगडे (पोलीस पाटील), माधवी बामुगडे (ग्रामसेविका), निळेकर (अंगणवाडी सेविका) आणि रा.जि.प शाळेचे मुख्याध्यापक सुहास चांदोरकर यांसह महिला महाविद्यालयाचे प्राचार्य प्रसन्न म्हसळकर, एनएसएस विभाग प्रमुख प्रा. ममता बिंद, प्रा योगिता बराटे आणि ५० स्वयंसेविका उपस्थित होत्या.

## महालक्ष्मी पूजेसह मकरसंक्रांत साजरी



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत नगर परिषद हद्दीतील दहिवली गावात १६० वर्षांची परंपरा आणि सर्वात जुना धार्मिक कुळाचार असलेली ग्रामदैवत श्री महालक्ष्मीची पूजा व मकरसंक्रांत मोठ्या भक्तिभावाने साजरी झाली.

या वर्षी श्री महालक्ष्मी पूजेचा मान माजी नगराध्यक्ष राजेश व राजेश्री लाड या उभयंताना मिळाला होता. त्यांच्या हस्ते पूजा व देवीचा अभिषेक करण्यात आला. सायंकाळी गावच्या पाटील आळीतील महिलावर्गान हभप दिघे यांच्या पुढाकाराने हरिपाठ करून परिसर भक्तिमय केला. त्यानंतर भैरवनाथ प्रासादिक मंडळाचे भजन गायक भरतबुवा बढेकर यांनी सादर केले. त्यांना पखवाज साथ मंगेश बडेकर, तर तबला साथ आदित्य पवार यांनी केले.

या उत्सवाला संपूर्ण दहिवली पंचक्रोशीतील ग्रामस्थ हजर होते. विशेष म्हणजे सार्वजनिक रक्तदाते राजाभाऊ कोठारी, नगरसेवक रामदास गायकवाड, कुमेश मोरे, नगरसेविका सुचिता खोत, जान्हवी देवघरे उपस्थित होते. मोरे यांनी त्यांच्या आईच्या स्मरणार्थ मंडळास कपाट भेट दिले. त्याबद्दल मंडळाने त्यांचे आभार व्यक्त केले. दुसऱ्या दिवशी महिलांनी हळदीकुंकू समारंभ साजरा केला.

## कुमार राष्ट्रीय कबड्डी स्पर्धा

# महाराष्ट्र संघ बाद फेरीत



**विजयावाडा : वृत्तसंस्था**

महाराष्ट्राने ५१व्या कुमार गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत सलग दुसरा विजय मिळवत बाद फेरी गाठली. या विजयाने महाराष्ट्राने ब गटात अव्वल स्थान पटकाविले.

आंध्र प्रदेशातील विजयवाडा येथील बंदिस्त क्रीडा संकुलातील मॅटवर झालेल्या ब गटातील दुसऱ्या साखळी सामन्यात महाराष्ट्राने चुरशीच्या लढातीत उत्तराखंडचा प्रतिकार ५०-४७ असा मोडून काढला. झोकात सुरुवात करीत महाराष्ट्राने चौथ्या मिनिटाला लोण देत १०-०१ अशी आघाडी घेतली, पण त्याने हार न मानता उत्तराखंडने त्या लोणची परतफेड करीत ११-१६ अशी आघाडी कमी केली. पुन्हा मध्यंतर होता होता आणखी एक लोण देत पूर्वार्धात ३४-३० अशी आघाडी घेतली. उत्तरार्धात सामना रंगतदार अवस्थेत पोहचला.

चार गुणांनी पिछाडीवर पडलेल्या महाराष्ट्राने आक्रमक खेळ करीत लोण देत ४३-३४ अशी आघाडी घेतली. पुन्हा उत्तराखंडने लोण देत ही आघाडी ४३-४४ अशी कमी केली. शेवटच्या पाच मिनिटात सामना ४६-४६ अशा बरोबरीत असताना शुभम बिटकेने चतुरईने बोनस व नंतर दोन गुण घेत महाराष्ट्राच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली. त्याला चढाईत जीत सिंग, तर पकडीत अतुल जाधव व वेदान्त जाधव यांची मोलाची साथ लाभली.

## राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत तनिष्का पाटीलला दोन पदके

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील पेझारी येथील ना.ना. पाटील हायस्कूल पोयनाड, इयत्ता ६ वी (अ) मधील विद्यार्थिनी तनिष्का राकेश पाटील हिने गोवा येथील राष्ट्रीय स्पर्धेत बेल्ट रेसलिंगमध्ये रौप्य आणि मांस रेसलिंगमध्ये कांस्यपदक जिंकले.



तनिष्कला शिक्षक संतोष कवळे आणि त्यांची टीम तसेच आई-वडील व घरातील सर्व मंडळी, शालेचे मुख्याध्यापक शिक्षक, यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले. याआधीही तिने विविध स्पर्धांमध्ये सहभागी होत चमकदार कामगिरी केलेली आहे. नुकत्याच झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेत दोन पदके जिंकल्याने तिचे अभिनंदन होत आहे.

# महाडचा आरुष कोल्हे मुंबई क्रिकेट संघाचा कर्णधार

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील महाडच्या एसबीसी क्रिकेट अकॅडमीचा खेळाडू आरुष सचिन कोल्हे याची मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या १४ वर्षाखालील मुलांच्या क्रिकेट संघाच्या कर्णधारपदी निवड झाली आहे. मुंबई संघाकडून खेळताना आरुषने सातत्याने चांगली कामगिरी केली होती तसेच मुंबईतील निवड चाचणी स्पर्धेतही सतत मोठी धावसंख्या उभारली व अनेकदा शतकी खेळी करून संघाला विजय मिळवून दिला आहे.

गतवर्षीच्या क्रिकेट हंगामात आरुष मुंबईच्या १४ वर्षाखालील मुलांच्या संघाचा उपकर्णधार होता. या वेळी त्याच्या खेळातील सातत्य व नेतृत्वाचे गुण बघून त्याची कर्णधारपदी निवड करण्यात आली आहे. महाडच्या एसबीसी क्रिकेट अकॅडमीत आरुषने



क्रिकेटचे धडे गेली आठ वर्ष घेत आहे. आरुषची मेहनत व खेळातील सातत्य उल्लेखनीय असून त्याच्या यशात आई-वडिलांचे नेहमीच प्रोत्साहन मिळत आहे. या निवडीबद्दल सर्वत्र त्याचे कौतुक होत आहे.

१८ जानेवारीपासून गुजरात येथे पश्चिम विभागीय १४ वर्षाखालील मुलांच्या क्रिकेट स्पर्धेत आयुष कोल्हे मुंबई संघाचे नेतृत्व करणार आहे. या स्पर्धेत गुजरात, बडोदा, सौराष्ट्र, महाराष्ट्र, मुंबई हे संघ सहभागी होणार आहेत.

एसबीसी क्रिकेट अकॅडमीचे प्रशिक्षक आवेश चिचकर यांनी आरुषचे कौतुक केले असून तो मेहनती व तितकाच गुणवान खेळाडू असल्याचे त्यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. त्याचप्रमाणे संजीव शेठ, विजय जाधव, कल्याण जगदाळे, ॲड.दत्ता वाडकर, ॲड. पंकज पंडित, संदीप शेठ, अशोक कोकणे, विनायक जाधव, अनिल हेलेकर यांनी त्याचे अभिनंदन केले.

## गतविजेत्या कर्नाटकला नमवून विदर्भ अंतिम फेरीत

### विजय हजारे ट्रॉफीत अमन मोखाडेचे शतक

**बंगळूर : वृत्तसंस्था**

सलामीवीर अमन मोखाडे याचे झंझावाती शतक आणि रविकुमार समर्थ याच्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर विदर्भाने विजय हजारे ट्रॉफीच्या उपांत्य फेरीत कर्नाटकचा सहा गडी राखून पराभव केला. या विजयासह विदर्भाने दिमाखात अंतिम फेरीत धडक मारली आहे.

प्रथम फलंदाजी करताना कर्नाटकने करुण नायर आणि कृष्णन श्रीजित यांच्या अर्धशतकांच्या जोरावर ४९.४ षटकांत २८० धावा केल्या होत्या. विदर्भाच्या दर्शन नळकांडे याने पाच बळी घेत कर्नाटकला मोठी धावसंख्या उभारण्यापासून रोखण्यात यश मिळवले.

यानंतर २८१ धावांच्या लक्षाचा पाठलाग करताना विदर्भाची सुरुवात खराब झाली. अथर्व तायडे (६) लवकर बाद झाला, मात्र त्यानंतर अमन मोखाडेने १२२ चेंडूंत १२ चौकार आणि दोन षटकारांच्या मदतीने १३८ धावांची मॅरेथॉन खेळी केली. अमन आणि ध्रुव शोरे (४७) यांनी ९८ धावांची भागीदारी करून डावाला आकार दिला. त्यानंतर अमन आणि रविकुमार समर्थ यांनी तिसऱ्या विकेटसाठी १४७ धावांची निर्णायक भागीदारी केली. रविकुमारने ६९ चेंडूंत ७६ धावांची नाबाद खेळी करत विदर्भाच्या विजयावर शिक्कामोर्तब केले. विदर्भाने हे लक्ष्य ४६.२ षटकांत चार गड्यांच्या मोबदल्यात पूर्ण केले.



## क्रीडा दिनानिमित्त विविध खेळांची स्पर्धा

**अलिबाग : प्रतिनिधी**

भारतासाठी ऑलम्पिकचे पहिले वैयक्ति पदक मिळवून देणारे कुस्तीपटू स्व. खाशाबा जाधव यांच्या जयंतीनिमित्त रायगड जिल्हा क्रीडा संकुल, नेहुली, अलिबाग या ठिकाणी विविध खेळांच्या स्पर्धेचे आयोजन करून महाराष्ट्र राज्य क्रीडा दिन साजरा करण्यात आला.

राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत रायगड जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, प्रिझम सामाजिक विकास संस्था अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच स्वयंसिध्दा सामाजिक विकास संस्था रोहा, स्पर्धा विश्व अकॅडमी अलिबाग यांच्या सहकार्याने आणि अधिकारी प्रकाश वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धा रंगली.

या वेळी क्रीडा कार्यालय सहकारी, प्रिझम संस्थेच्या अध्यक्ष तथा राष्ट्रीय युवा पुरस्कारार्थी तपस्वी गोंधळी, स्वयंसिद्धा संस्थेच्या अध्यक्षा तथ स्पर्धा विश्व अकॅडमी संचालक सुचिता साळवी यांच्यासह खेळाडू उपस्थित होते. या ठिकाणी ८०० मी.धावणे, १०० मी. धावणे, गोळाफेक आदी खेळांची स्पर्धा घेण्यात आली.

## वैभव सूर्यवंशीचा नवा विश्वविक्रम

**बुलावायो : वृत्तसंस्था**

भारताचा १४ वर्षीय युवा फलंदाज वैभव सूर्यवंशी याने १९ वर्षांखालील विश्वचषक स्पर्धेत बांगलादेशविरुद्ध खेळताना एका मोठ्या विक्रमाला गवसणी घातली. त्याने केवळ ६७ चेंडूंमध्ये ७२ धावांची तुफानी खेळी केली, ज्यामध्ये सहा चौकार आणि तीन षटकारांचा समावेश होता. आपल्या नेहमीच्या आक्रमक शैलीत फलंदाजी करत वैभवने अवघ्या ३० चेंडूंमध्ये आपले अर्धशतक पूर्ण केले.

१४ वर्षे २९६ दिवस वय असलेल्या वैभवने पुरुषांच्या १९ वर्षांखालील विश्वचषक सामन्यात ५०हून अधिक धावा करणारा सर्वात तरुण खेळाडू होण्याचा मान मिळवला आहे. यापूर्वी हा विक्रम अफगाणिस्तानच्या शाहिदुल्ला कमालच्या (१५ वर्षे १९ दिवस) नावावर होता.

## डब्ल्यूपीएलमध्ये यूपीचा मुंबईवर विजय

### हरलीन देओलची झंझावाती खेळी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

वूमन्स प्रीमियर लीग २०२६ (डब्ल्यूबीएल)मधील आठव्या सामन्यात गुरुवारी यूपी वॉरियर्सने गतविजेत्या मुंबई इंडियन्सचा सात गडी राखून पराभव केला. सलग तीन पराभवांनंतर यूपीने या स्पर्धेतील आपला विजयाचा श्रीगणेशा केला, तर मुंबईची विजयाची हॅट्ट्रिक थोडक्यात हुकली.

प्रथम फलंदाजीला उतरलेल्या मुंबई इंडियन्सची सुरुवात संथ झाली. अमनजोत कौरने ३८ धावांचे योगदान दिले, तर कर्णधार हरमनप्रीत कौर (१६) स्वस्तात बाद झाली. नॅट सायव्हर-ब्रंटने एकाकी झुंज देत ४३ चेंडूंत नऊ चौकार आणि एक षटकारासह ६५ धावा कुटल्या. निकोला केरीने (नाबाद ३२) तिला चांगली साथ दिली, ज्यामुळे मुंबईने २० षटकांत ५ बाद १६१ धावांपर्यंत मजल मारली.

१६२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना यूपी वॉरियर्सने दमदार सुरुवात केली. मेग लॅनिंग (२५) आणि फोबी लिचफिल्ड (२५) यांनी धावसंख्या शंभरी पार नेली खरी, पण सामन्याचे खरे आकर्षण ठरली ती हरलीन देओल. हरलीनने केवळ ३९ चेंडूंत १० चौकारांच्या मदतीने नाबाद ६४ धावांची आक्रमक खेळी केली. तिला क्लो ट्रायॉनने (नाबाद २७) सुरेख साथ दिली. यूपीने हे लक्ष्य १८.१ षटकांतच तीन गडी गमावून पूर्ण केले.







पनवेल : येथील महापालिका निवडणुकीत विजयी झालेले भाजप महायुतीचे प्रभाग ९मधील उमेदवार महादेव मधे, प्रतिभा भोईर, दमयंती भोईर, शशिकांत शेळके; प्रभाग १०मधील रवींद्र भगत, सरस्वती काथारा, मोनिका महानवर, विजय खानावकर यांनी आमदार प्रशांत ठाकूर, भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांची भेट घेतली. सर्वांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. या वेळी माजी जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र पाटील, भाजप नेते अशोक मोटे, प्रभूदास भोईर, माजी ग्रामपंचायत सदस्य सुरेश भोईर, युवा नेते मयूर शेळके आदी उपस्थित होते.










पनवेल : येथील महापालिका निवडणुकीत विजयी झालेल्या भाजप महायुतीच्या उमेदवारांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेऊन आशीर्वाद घेतले तसेच माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांचीही भेट घेतली. सर्व नवनिर्वाचित नगरसेवकांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com